ब्रौन (पर्व.) अमे. खं. ब्रितिश अमेरिकेंत.
ब्लाकबर्न (श.) यू. खं. इंग्लंदांत चेशायरमध्यें डारवेन नदीवर.
ब्लाकहोरस्त(पर्व.) यू. खं. आस्त्रियांत बवेरियाचे पश्चिमेस.

ब्लागोशेन्स्क(श.) आशि. खं. रुशिया देशांत. [१५७१२.
ब्लांक (शिख.) यु. खं. इतालींत आल्प्स पर्वताचें. उंची फूट

भ.

भगवंतगड(गां.कि.)हिं. मुं. इ. रत्नागिरी. जि. मालवण ता.
भगुर (गां.) हिं. मुं, इ. नाशिक जि. व ता. येथें गोरी फौज असते. रे. स्टे.
भटकळ (गां.) हिं. मुं. इ. द. महा. दे. उत्तर कानड्यांत.
भडगांव (श.) हिं. मुं. इ. खानदेश. जि. पेठ्याचें गांव. गिरणेच्या वेळक्यामध्यें. २ कोल्हापूर सं. कापशी पहा.
भडोच (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. जि. नर्मदेच्या मुखाजवळ.
भत्र (देश.) आफ्रि. खं. मिसर देशाचें गांव.
भद्रा (न.) हिं. म. इ. म्हैसूर सं. निघून तुंगेस मिळते.
भद्राचलम (गां.) हिं. मध्यप्रां. सिरोंच्या जि. तापीचे कांठीं.
भद्रेश्वर (श.) हिं. मुं. इ. कच्छ प्रां. येथें जैनधर्माचीं देवालयें [आहेत.
भयगड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. पूर्वेस.
भरतगड (गां.कि.) हिं मुं. इ. रत्नागिरी जि. मालवण ता.
भरतगंज (गां.) हिं. वाय. प्रां. अलाहाबादेपा. ४० मैल.
भरतपूर(श.कि.सं.) हिं. राजपुतान्यांत सं. आग्र्याचे पश्चिमेस ३० मैलांवर. जाट लोकांचें. जाट व इं. ल. १८२६. येथील खाणींतील लाल दगड ताजमहाल ह्या इमारतीस लाविला आहे.
भराई (गां.) हिं. मु. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता.
भवानी (न.) हिं. म. इ. कुर्ग प्रां. कावेरीला मिळणारी नदी.
भाकुरी (गां.) हिं. वाय. प्रां. अलीगडपा. ७ मैल.

भागलपूर (श.) हिं. बं. इ. बहार प्रां. गंगेच्या काठीं. जि. स. १८५५ त सांथल लोकांचें बंड.

भागीरथी (न.) हि. हिमालयांतून गंगा व यमुना ह्या नद्या निघून त्या प्रयागाजवळ एक झाल्यावर तिला हें नांव आहे. ही बंगालच्या उपसागरास सहस्र मुखांनीं मिळते. हींत नावा चालतात लां. १५२० मै.

भाटकल (गां.) हिं. मुं. इ. द. महाराष्ट्रदे. उत्तरकानड्यांत. येथें मोठें देवस्थान आहे.

भाटी (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. रत्नागिरी ता.

भातवड (गां.) हि. मुं. इ. खानदेश जि. नंदूरबार ता.

भातसा (न) हिं. मु. इ. ठाणे जि. पश्चिमवाहिनी नदी.

भाताचातांडा (श.) हिं. मु. इ. सिंध प्रां. हैदराबाद जि. तालुका.

भादर (न.) हिं. मुं. गुजराथ मां. काठेवाडमध्यें.

भादली भाद (गां.) हिं. मु. इ. खानदेश जि. जळगांव ता.

भादाणें (गां.) हि. मुं. इ. ठाणे जि. वसई ता.

भाद्रण (श.) हि. मुं. इ. गुजराथ प्रां. गायकवाडचें रा.

भानपूर (श.) हिं. वाय. प्रां. गोरखपूर प्रां.

भानपुरा (गां.) हि. माळव्यात इंदूर सं.

भानसी (न.) हिं. भूतान सं. ब्रह्मपुत्रेस मिळते. २ ठाणे जि.

भानेर (शिख.) हि. मध्यप्रां. सातपुड्याचें उंच शिखर.

भामनगर (गां.) हिं. वाय-प्रां. भूदन प्रां.

भामपूर (श.गां.) हि. वाय-प्रां. माळव्यांत चंबळा नदीचे काठीं.

भामा (न.) हिं. मुं. इ. पुणें जि. भीमेस मीळणारी नदी.

भामू (गां.) हि. ब्रह्मदे. इरावतीचे कांठीं.

भामेर (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. पिंपळनेर ता.

भायंदर (गां.) हिं. मुं. इ. ठाणे जि. बंदर. येथें मिठाचा मोठा व्यापार चालतो.

भारखस (गां.) हिं. वाय. प्रां. गुरवळ प्रां. दिल्लीपा. ५० मैल.

भारोळी (गां.) हिं. वाय. प्रां. मिनपुरी पा. २३ मैल.

भालवली (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता.

भालोद (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सावदे ता.

भावनगर (श.सं.) हिं. मुं. इ. गुजराथेंत काठेवाडमध्यें गोहिलवाडा विभागांत. २ अमदाबाद जि. शहर.

भावलपूर (श.सं.) हिं. राजपुताम्याचे उ. पंजाब इ. घारा व सिंधूचे दक्षिणेस. २ बहार प्रां. गंगेवर.

भाळवणी (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. खानापूर ता. २ सोलापूर जि. पंढरपूर ता.

भिकारीफार (गां.) हिं. वाय. प्रां. बरेलीपा. ४० मैल.

भिश्री (गां.) हिं. वाय. प्रां. गंगा नदीवर काशीपा. २८ मैल.

भिलकोट (गां.) हिं. वऱ्हाडांत उमरावती जि. [त्रेच्या कांठीं शहर.

भिलवडी (गां.) हिं. मुं. इ. सातार जि. तासगांव ता. २ तुंगभ·

भिलवण (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. इंदापूर ता.

भिल्लाल (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. डहाणु ता.

भिवापूर (गां.) हिं. मध्यप्रां. नागपूर जि.

भीमगड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. पूर्वेस.

भीमथडी (प्रां.) हिं. मुं. इ. पुणें जि. भीमा नदीचे कांठच्या प्रदेशास ह्मणतात. हा तालुका असून ठाणें पाटस येथें आहे.

भीमा (न.) हि. मुं. इ. पुणें जि. खेड ता. भीमा शंकराचे डोंगरापा. निघून कृष्णेस मिळते. कांठीं पंढरपूर.

भीमाशंकर (शिख.) हिं. मुं. इ. पुणें जि. खेड ता. सह्याद्रि पर्वताचें शिखर. येथून भीमा नदी निघाली आहे.

भुईज (गां.) हि. मु. इ. सातारा जि. वाई ता.

भुटीयाना (प्रां.) हि. वाय. प्रां. [२२ मैल.

भुनियाना (गां.) हि. राजपुतान्यांत जोधपूर सं. पोखरणपा.

भुलव (श.) हि. बं. इ. जि. व तालुका.

भुलेश्वर (देऊळ.) हि. मुं. इ. मुंबईंत प्रसिद्ध देवालय आहे.

भुवनगीर (गां.) हिं. निजामचे रा. हैदराबादेपा. ३२ मैल.

भुसावल (श.) हि. मुं. इ. खानदेश. जि. तालुका रे. स्टे. येथें तापी नदीस मोठा पूल आहे.

भूज (श.) हि. मुं. इ. कच्छ प्रां. मुख्य श. हे राव श्रीखेंगारजी ह्यांनीं संवत् १६०५ त बांधिलें. कापडावरील चित्रपट तयार होतात.

भूतान (दे.) हिं. हिमालयाचे पायथ्यापाशीं स्वतंत्र सं. ह्याची राज. तासीसदन.

भूदरगड (श.) हि. मुं. इ. कोल्हापूर सं. तालुका. तांबडी, जांभळी, पांढरी या रंगांची माती सांपडते.

भूमध्य (समु.) यु. खं. दक्षिण अंगास व आशि. खं. तुर्कस्तानचे पश्चिमेस. आफ्रि. खं. उत्तरेस.

भूयगांव (गां.) हि. मु. इ. ठाणे जि. वसई ता.

भूषणगड (गां.कि.) हिं. मुं. इ. सातारा जि. खटाव ता.

भूळ (गां.) हि. मुं. इ. खानदेश जि. चोपडें ता.

भेडस (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. पन्हाळे पेट्यांत.

भेडाघोंट (गां.) हिं. मध्य प्रां. जबलपूर जि. नर्मदेच्या कांठीं.

भेरा (श.) हिं. मुं. इ. शहापुर जि. येथें हस्तीदंती चुडे चांगले होतात.

भेलसई (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. खेड ता.

भेलसा (श.) हिं. शिंद्याचे राज्यांत बतवा नदीवर भोपाळचे सरहद्दीवर.

भैसदेही (गां.) हिं. मध्य प्रां. बैतूल जि.

भोकर (न.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सावदे ता.

भोकार (सं.श.) हिं. बं. इ. छोटानागपूर प्रां. सं.

भोकारीरी (श.) हिं. वाय. प्रां. मुजफरनगरपा. १४ मैल गंगानदीचे कांठीं. [मल.

भोगपूर (श.) हिं. वाय. प्रां. साहरणपूर प्रां. हरिद्वारपा. १३

भोगावती (न.) हिं. मु. इ. खानदेश जि. भुसावळ ता. २ भागीरथीस मिळणारी नदी. ३ सोलापूर जि. सीना नदीस मिळणारी नदी.

भोज (प्रां.) हिं. काशी आहे तो देश.

भोजडे (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव ता.

भोजापूर (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. सिन्नर ता. येथे बांगड्यांचा कारखाना आहे.

भोदर (न.) हिं. मुं. इ. गुजराथेंत कांठेवाडमध्यें.

भोपाळ (श.स.) हिं. मध्यप्रां. माळव्यांत; येथें बेगमचें राज्य आहे. जवळच फत्तेगड किल्ला आहे. [ब्रांचें.

भोर (श.सं.) हिं. मुं. इ. पुणें जि. अष्टप्रधानांपैकी पंत सचीव

भोरकस (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. हवेली ता. मुळशी पे-
भोसें (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. तासगांव ता. [ट्यांत.
भंडारकवढें (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. व ता. भीमेच्या कांठी.
भंडारा (श.) हिं. मध्यप्रां. जिल्हा आहे. वैनगंगेवर पित-
ळेचीं भांडीं होतात.
भांडूप (गां.) हिं. मु. इ. ठाणें जि. स्टेशन. येथें दारू काढ-
ण्याचे कारखाने आहेत.
भांदक (श.) हिं. मध्यप्रां. चांदा जि. येथे कोरींव लेणीं आ-
हेत. विड्याचीं पानें होतात.
भिंगार (श.) हिं. मुं. इ. नगर जि. व ता. गांवांत हौद आहेत.
लुगडीं चांगलीं होतात. सरकारचा तोफखाना आहे.
भिग्री (श.) हिं. वाय. प्रां. गोरखपुराचा. ५० मैल.
भिवंडी (श.) हिं. मुं. इ. ठाणें जि. तालुका आहे.
भेंडाळी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. निफाड ता.
भोंकरपाडा (न.) हिं. मुं. इ. ठाणें जि. कर्जत ता. खालापूर पेट्यांत.
भोंसें (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. पंढरपूर ता.

म.

मकरपुरा (गां.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. गायकवाडचे राज्यांत
बडोद्याजवळ. येथील राजवाडा फार उत्तम आहे.
मकराई (सं.श.) हिं. मध्य प्रां. हुसंगाबाद जि.
मकरान (प्रां.) आशि. खं. बलुचिस्तानांत.
मकल्ला (श. बं.) आशि. खं. अरबस्तानांत हैद्रामौत प्रां.
मकवानपूर (श.) हिं. नेपाळ सं. येथें इंग्लिश व नेपाळी लोक यांची
मोटी लढाई झाली. स. १८१६.

मक्का (श.) आशि. खं. अरबस्तान दे. हेदजद प्रां., राजधानी. येथें मुसलमानी धर्म स्थापणारा महंमद स. ५७० त जन्मला.

मक्कासर (श.सामु.) आशि. खं. द. बोर्निओ बेट व सेलिबीज बेट यांमध्ये सामु. व सेलिबीज बेटांत शहर.

मकाव (बे.) आशि. खं. चीनदेशाजवळ चिनई समु. पोर्तुगीज लोकांचे ताब्यांत.

मक्विनेझ (श.) आफ्रि. खं. मोरोक्कोमध्यें. [कांठीं.

मक्कुला (श.बं.) आशि. खं. अरबस्तानांत हिंदिमहासागराचे

मगुई (श.) हिं. बं. इ. पूर्वेस मणिपूरपा. २२ मैल. [वर.

मचनेनलाक (श.) यू. ख. इंग्लंदांत आपशायरमध्यें सेवर्न नदी-

मचिवाडा (गां.) हिं. पं. इ. सरहिंद प्रां. लुधियानापा. २२

मचू (न.) हिं. मुं. इ. कांठेवाडमध्यें हालर सं. [मैल.

मचेरी (श.) हिं. राजपु. अलवार प्रां. नसिराबादपा. ३ मैल. पूर्वी मोठे शहर होते. [मैल.

मच्छली (श.) हिं. वाय. प्रां. जोतपूर प्रां. जोतपुराहून ११

मच्छलीपट्टण (श.बं.) हिं. म. इ. कारोमांडल किनाऱ्यावर उत्तरसरकार्स प्रां. जि. कृष्णा नदीवर.

मच्छिंद्रगड (कि.) हि. मुं. इ. सातारा जि. वाळवे ता.

मजदे (श.) हि. मुं. इ. सिंध प्रां. कराची जि. तालुका.

मढ (गां.) हिं. मुं. इ. ठाणे जि. कर्जत ता. खालापूर पे. येथें श्रीगणपतीचें स्थान आहे.

मढी (गां.श.) हि. मु. इ. नगर जि. शेवगांव ता. कान्होबाचें देऊळ आहे. २ गुजराथ प्रां. गायकवाडचें शहर.

मणिपूर (श.सं.) हि. बं. इ. पूर्वेस असाम प्रां. आग्नेयीस.

मणेराजुरी (गां.) हि. मुं. इ. कोल्हापूर सं. आजरें ता. इचलकरंजीकरांचें सं.

मतभगा (न.) हि. बं. इ. सुंदरबनाजवळ भागीरथीचा फांटा.

मतवाडा (गां.) हि. वाय. प्रां. माळव्यांत.

मंत्रबीज (श.) हि. मुं. इ. सिंध प्रां. कराची जि. तालुका.

मत्स्य (दे.) हि. प्रयाग, कानपूर ह्या प्रांतांचे पूर्वीचें नांव.

मथुरा (श.) हिं. वाय. प्रां. यमुनेच्या कांठीं जि. येथें श्रीकृष्णाचा जन्म झाला. लांकडावर चित्रें खोदण्याचे काम चांगलें होतें.

मदपूर (श.) हि. म. इ. म्हैसूर प्रां. श्रीरंगपट्टणपा. ३४ मैल.

मदनगड (कि.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.

मदनपूर (गां.) हि. वाय. प्रां. गोरखपूरपा. ३० मैल. अयोध्या प्रां.

मदरामियो (श.) हि. ब्रह्मदे. आव्हापा. २९ मैल. इरावतीवर.

मदापोलम (श.) हि. म. इ. येथें कापसाचीं वस्त्रें निघतात.

मदिगोले (श.) हि. म. इ. विजगापट्टणपा. ४० मैल.

मदीना (गां.) हिं. वाय. प्रां. हासी शहरापा. ३१ मैल. २ अरबस्तानांत मक्केच्या उत्तरेस. येथें महंमद स. ६३२ त मेला.

मदीरा (बे.) यु. खं. पोर्तुगाल दे. पश्चिमेस अतलांतिक महासागरांत.

मदुधूर (श.) हिं. म. इ. तिनवेल्लीपा. २९ मैल.

मदुरा (श.) हिं. म. इ. मथुरा जि. ही पांड्य वंशाच्या राजाची रा. होती. दिंदीगलपा. ३१ मैल.

मदुरू (श.) हिं. म. इ. मच्छलीपट्टणपा. २२ मैल.

मदेरसपट्टण (कि.) हि. म. इ. येथेच फोर्त सेंत जार्जचा किल्ला आहे. हे इ. स. १६३९ त चंद्रगिरीच्या राजानें इंग्लिशांस दिलें. यास मद्रास म्हणतात. [मिळते.

मदेरा (न.) अमे. खं. द. आझील दे. तून अमाझोन नदील।

मद्रपूर (श) हिं. बं. इ. भागलपूर प्रां. भागलपूरपा. २२ मैल.

मद्रास (श.बं.) हिं. म. इ. मुख्य शहर कारोमांडल किनाऱ्यावर. येथें गवरनर राहातात. फोर्त सेंत जार्ज किल्ला आहे, व्यापार मोठा चालतो. इमारती पहाण्यासारख्या आहेत. रेलवेसंबंधानें या शहरच्या मर्यादेप्रमाणें सर्व हिंदुस्थानांत घड्याळें लाविनात. शिक्के खोदण्याचें काम होतें.

मदर (गां.) हिं. म. इ. मच्छलीपट्टणापा. २२ मैल.

मधराजपुरा (गां.) हि. राजपु. जयपूर सं.

मधुपूर (श.) हि. वाय. प्रां. बरेली प्रां. बरेलीपा. ११ मैल.

मधुपुरा (श.) हि. राज. जयपूरपा. २९ मैल. २ नशिराबादपा. १०० मैल.

मधुरा (श.) हि. म. इ. मदुरा शब्द पहा.

मधुवनझी (गां.) हि. म. इ. कोइमतूर प्रां. [मुलूख.

मध्यआशिया (दे.) आशि. खं. स्वतंत्र तार्तरीचे आसपासचा

मध्यधार (पर्व.) हि. मुं. इ. कच्छ प्रां. एक पर्वताची ओळ.

मध्यप्रांत (दे.) हि. वऱ्हाडचे उत्तरेस, ज्यास हल्लीं सेंत्रल प्राविन्सीज म्हणतात; यांत नागपूर मुख्य शहर. हा प्रां. भोसल्यापासून १८५३ त इंग्लिशांस मिळाला.

मध्यहिंदुस्थान (दे.) हि. महाराष्ट्र देशाचे उत्तरेस जो प्रांत तो. यांत माळवा प्रांत येतो.

मन (न.) हि. वऱ्हाड. प्रां. अकोला जि. पूर्णेस मिळते.

मनखेड (गां.) हिं. मुं. इ. नाशिक. जि. पेंठ ता.

मनगोळी (श.) हिं. मुं. इ. विजापूर जि.

मनमाड (श.) हिं. मुं. इ. नाशिक. जि. चांदवड ता. रे. स्टे.

मन्मौथ (श.) हि. यू. खं. इंग्लंदांत पश्चिमेकडील प्रांतांत वायनदीवर.

मनरोविया (श.) आफ्रि. खं. प. आफ्रि. सेबिरियाची राज.

मनस्तर (प्रां.) यु. खं. अयर्लंदांत.

मनिरी (गां.) हि. मुं इ. ठाणे जि. साष्टी ता.

मनु (गां.) हिं. मुं. इ. सातार जि. औंध सं.

मनोर (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. माहिम ता.

मयुराबाद (गां.) हि. मुं. इ. खानदेश जि. जळगांव ता.

मरकारा (श.) हि. म. इ. कुर्ग सं. राजधानी.

मरडी (गां.) हि. मुं. इ. बेळगांव जि.

मरळी (गां.) हि. मुं. इ. सातारा जि. पाटण ता.

मरुत (दे.) हिं. अजमीर मारवाड इ. देशांचें पूर्वीचें नांव.

मरू (न.) हिं. वऱ्हाडांत सातपुड्याजवळून निघून पूर्णानदीस मिळते.

मरे (न.) आस्ट्रे. खं. द. पासि. महासा. आस्ट्रालियांत वारगाण पर्वतांतून निघून पासि. महा. मिळाली.

मरोळी (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. डाहाणू ता. [लां. मै. १२००.

मरंबिजी (न.) पासि. महासा. आस्ट्रालियांत मरे नदीला मिळते.

मर्कारा (श.) हिं. म. इ. मरकारा शब्द पहा.

मर्गुई (बे.) हिं द. हिंदीमहासागरांत. तेनासरीमध्या प.

मर्चिसन (पर्व.) अमे. खं. ब्रिटीश अमेरिकेंत. २ आस्ट्रेलियांत नदी.

मर्थरतिदविल (श.) यु. खं. इंग्लंदांत वेल्समध्यें टाप नदीवर.

मर्व (श.) आशि. खं. प. तार्तरींत बुखाऱ्याचे दक्षिणेस.

मार्सि (न.) यु. खं. इंग्लंदांत लांकेशायर प्रां. इचे कांठीं लिवरपूर श.

मलआफ्ग्यालोवे (भू.) यू. खं. स्कातलंदांत दक्षिणटोंक.

मलकापूर (श.) हिं. वऱ्हाडांत बुलडाणे जि. तालुका. रे. स्टे.

मलखेड (श.) हिं. म. इ. निजामचे रा.

मलग्रेव (बे.) आशि. खं. द. पासि. महासाग. पोलिनिशीयापैकीं एक बेटसमूह.

मलप्रभा (न.) हिं. सह्याद्रींतून तोरगल सं. निघून विजापूर जि. कृष्णेस मिळते.

मलबार (प्रां.) हिं.म.इ. पश्चिम अंगास समुद्रकिनाऱ्याची पट्टी. ह्या प्रांतांत वाद्यें तयार करितात.

मलवठ (गां.) हि. मुं. इ. पुणे जि. शिरूर ता.

मलवडी (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. माण ता.

मलाक्का (बे. प्रां) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पाच्या द.

मलागा (श. बं.) यू. खं. स्पेन दे. दक्षिणेकडील भागांत.

मलादेता (शि.) यू. खं. स्पेन देशांत.

मलाया (दे.) हिंदिमहासाग. मलाया व सुमात्रा बेट ह्यांचेमध्यें मलाक्काची सामुद्रधुनी आहे.

मलारी (गां.) हिं. वाय. मां. कमाऊन मां. येथील लोक घरांस कुलुपें न घालतां दारांत कुत्रीं बांधितात. हे रजपुत लोक आहेत. [आहे.

मलाशिया (बे.) आशि खं. द. पासि. महासा. बेटसमुहास नांव

मलीनहेड (भू.) यू. खं. अयर्लंद्च्या उत्तरेस.

मलीमणीघाट (घा.) हिं. मुं. इ. धारवाड जि. सिदपुराहून गेरसापास जाण्याच्या रस्त्यावर.

मलेश्वर (गां) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. नवसरी महालांत.

मलंगड (कि.) हिं. मुं. इ. ठाणे जि. कल्याण ता. कल्याणपा. ८ मैल. येथील पिराजळ ब्राम्हणाची पूजा आहे.

मलिंगपूर (गां.) हिं. मुं. इ. बेळगांवापा. ५८ मैल.

मल्याड (दे.) हिं. म. इ. मंगळूर प्रांत ह्याचे पूर्वीचे नांव.

मह्ल (बे.) यू. खं. अतलांतिक महासागरांत.

मल्हारगड (कि.) हिं. मुं. इ. पुणे जि. पुरंदर ता.

मशद (श.) आशि. खं. इराणांत.

मसुर (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. कऱ्हाड ता.

मसुरी (गां.) हिं. वाय. मां. गुरवळपर. देरादून मां. हद्दीवर इंग्लिशानीं लोकांस औषधाकरितां स्थापलेलें ठिकाण. अफगाण लोकांची वस्ती असून येथें याकूबखानास कैदेंत ठेविलें होतें.

मसुरें (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. मालवण ता.

मसुआ (श.बं.) आफ्रि. खं. अबिसिनीया दे.

मसेलबर्ग (श.) यू. खं. स्कातलंदांत एदिंबरो मां. फिथ आफ् फोर्थ जवळ.

मस्कत (श.बं.) आशि. खं. अरबस्तानचे पूर्व किनाऱ्यावर. येथें डाळिंबें उत्तम होतात.

मस्किनो (अखा.) अमे. खं. मध्य अमेरिकेच्या पूर्वेस.

मस्ताद (सं.) यु. खं. जर्मनींत.

महतपूर (श.) हिं. मध्य प्रां. माळव्यांत.

महत्ताई (गां.) हिं. आराकान प्रां. आराकानपा. ८ मैल.

महमदखानतांडा (श.) हिं. मुं. इ. सिंधप्रां. हैदराबाद जि. तालुका.

महमदपूर (श.) हिं. वाय. प्रा. मुरादाबादेहून १४ मैल. २ आग्र्यापा. ४६ मैल. [व्यापार चालतो.

महमदापूर (श.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव ता. येथें गुरांचा

महर (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. शिकारपूर जि. तालुका.

महा (न.) हिं. मध्यप्रां. रायपूर जि. शहावा येथून निघून पूर्वेकडे जाऊन बंगालचे उपसा. कटक जवळ मिळते. यांत सोनें व हिरे सापडतात.

महागांव (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. विशाळगड सं. २ वऱ्हाड प्रां. नागपूरपा. ६९ मैल. अरुणा नदीवर.

महाड (श.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. तालुका.

महादीपूर (श.) हिं. निजामचे रा. गोदावरीचे काठीं.

महादेव (कि.शिख.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. आजरें सं. २ मध्यप्रां. छिंदवाडा जि. सातपुड्याचें शिखर.

महानंदा (न.) हिं. हिमालयाचे पायथ्यास सिक्कीमचे उत्तरेस उगम होऊन भागीरथीस मिळते.

महाबळीपूर (श.) हिं. म. इ. प्राचीन शहर. बळी राजाची राजधानी होतें.

महाबळेश्वर (शिख.) हिं. सह्याद्रि पर्वताचें शिखर. येथून कृष्णा नदी निघाली आहे. येथील हवा उत्तम आहे. गवरनर व इतर साहेब हे उन्हाळ्यांत राहतात.

महारगंज (श.) हिं. वाय. प्रां. गोरखपूर पर. गोरखपूरपा. २८ मैल.

महारगंजी (श.) हिं. वाय. प्रां. बनारसपा. २२ मैल.

महाराजदुर्ग (श.) हिं. म. इ. म्हैसूर प्रां. मंगळूरपा. ७३ मैल.

महाराजपूर (श.) हिं. मध्यप्रां. सिंद्याचे राज्यांत ग्वाल्हेरपा. १५ मैल, येथें इ. स. १८४३ त शिंदे व इंग्लिश ह्यांचे मध्यें लढाई. २ मध्यप्रां. मंडला जि. बंजर नर्मदा ह्यांचें संगमावर ल. १८५७ बंडवाले व इं.

महाराष्ट्रदेश (दे.) हिं. सातपुड्याचे द. पासून कोल्हापूर गोवेपर्यंतचा देश.

महाशीन (गां.) हिं. बं इ. ओड्या प्रां. संबळपुरापा. १०४ मैल.

महासिंगपूर (श.) हिं. मध्यप्रां. अलीगडपा. २६ मैल.

महाळुंगी (न.) हिं. मुं. इ. नगर जि. अकोला ता. निघून संगमनेर ता. प्रवरेस मिळते.

महि (न.) हिं. मध्यप्रां. माळव्यांतून निघून खंबायतचे अखातास मिळते. कांठीं खंबायत शहर.

महिकांठा (सं.) हिं. मुं. इ. गुजराथच्या ईशान्य भागास ह्मणतात, यांत पुष्कळ जहागिरी आहेत.

महिदपूर (श.) हिं. मध्यप्रां. माळव्यांत उज्जनीच्या उत्तरेस. येथें होळकर व इंग्रज ह्यांची इ. स. १८१७ त लढाई झाली.

महिपतगड (कि.) हिं. मुं. इ. रत्नागिरी. जि. संगमेश्वर ता.

महिमानगड (डों.कि.घा.गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. शंभुमहादेवाचे डोंगराचे ओळींत. माण ता.

महु (श.) हिं. मध्यप्रां. माळव्यांत इंदूरचे दक्षिणेस १२ मैल. येथें इंग्लिश फौजेची छावणी आहे.

महुधा (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. खेडा जि.

महेश्वर (श.) हिं. मध्यप्रां. नर्मदा नदीचे कांठीं होळकराचे राज्यांत. येथें महासाध्वि अहिल्याबाई हिनें नर्मदेस मोठमोठे घाट बांधिले आहेत.

महोबा (श.) हिं. वाय. प्रां. बुंदेलखंडांत बांदापा. ३५ मैल.

महंमदगड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. पूर्वेस.

मळगांव (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. मालेगांव ता.

मळा (घा.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

मळोली (गां.) हिं. मुं. इ. सोलापुर जि. माळशिरस ता.

माई (गां.) हिं. वाय. प्रां. मिनपुरपा. १९ मैल.

माईलस्ट्राम (भोंवरा.) यु. खं. नार्वेचे उत्तर किनाऱ्यास आहे.

माकिंझी (न.) अमे. खं. उ. अमे. कानडाचे रा. तून जाऊन आर्क्टिकमहासागरास. मिळते. लां. मै. २०००.

माकुरिया (प्रां.) आशि. खं. चिनई तार्तरींत प्रांत. यांतून अमूर नदी वाहते.

माखजन (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

मागद (दे.) हिं. बं. इ. पूर्वेस मणिपूर आहे. त्या देशाचें पूर्वीचें नांव.

मागदाला (कि.) आफ्रि. खं. अबसीनियांत प्रसिद्ध डोंगरी किल्ला.

मागदालिना (श.बं.न.) अमे. खं. द. अमे. कोलंबियांत. २ आंदीजपर्व. निघून कारेबीअन समु. मिळते.

माग्नसहोप (पर्व.) आफ्रि. खं. दक्षिण आफ्रिकेत.
माग्देबुर्ग (श.) यू. खं. जर्मनींत एल्ब नदीचे कांठीं.
मागेरू (बे.) यू. खं. नार्वेचे किनाऱ्यावर.
मागेलन (सामु.) अमे. खं. द. अमे. पाटागोनिया व टेरादेलफुईगो ह्यांचे मध्यें. [नटबंदीचें शहर.
माचमय (बे.श.) आशि. खं. जपान दे. उत्तरेस. यसो बेटांत मोठें
माचरोल (श.) हिं. मध्यप्रां. रेव्यापा. २४ मैल.
माचुंडी (गां.) हिं. वाय. प्रां. बरेलीपा. ४३ मैल.
माचुला (गां.) हिं. म. इ. गंतूर प्रां. गंतूरपा. ७३ मैल.
माचेरी अलनार (श.) हिं. राज. अलवार प्रां. अलवारपा. ७६ मैल.
मार्जीओरे (सरो.) यू. खं. इताली दे.
माजोर्का (बे.) यू. खं. स्पेनदे. भूमध्य समुद्रांत.
माजोगोया (श.) हि. ब्रह्मदे. उत्तर असामांत शिवपूरपा. ६७ मैल.
माजंकदिरा (प्रां.) आशि. खं. इराणांत एलबुर्ज पर्वताचे उत्तरेस.
माट (गां.) हिं. राजपु. मुत्रा व आलिगड यांमध्ये.
माटवण (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.
माडवगण (सं.श.) हि. मध्यप्रां. माळव्यांत धार सं. एक लहान स.
माडाजेसी (गां.) हि. म. इ. म्हैसूर प्रां. श्रीरंगपट्टणच्या उत्तरेस.
माढें (श.) हिं. मुं. इ. सोलापुर जि. तालुका.
माण (श.) हिं. मुं. इ. सातारा जि. तालुका. २ कुलाबा जि. तालुका. [गांवाजवळ भीमेस मिळते.
माण (न.) हि. मुं. इ. सोलापुर जि. पंढरपुर ता. सरकोली
माणकी (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळूण ता.
माणगांव (गां.) हि. मुं. इ. कोल्हापूर स. कागल स.

माणिकपुंज (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. मालेगांव ता. [नदीवर.
माणिकपूर (गां.) हिं. वाय. प्रां. अलाहाबादेपा. ३८ मैल. गंगा
माणिखांब (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. इगतपुरी ता.
मातर (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. खेडा जि. तालुक्याचें
मातापान (भू.) यू. खं. ग्रीस दे. मोरियाचे दक्षिणेस. [शहर.
माताभंग (न.) हिं. बं. इ. गंगानदीचा एक फांटा
माथेरान (डों.) हिं. मुं. इ. ठाणे जि. नेरळ गांवाजवळ उंच डोंगर. येथील हवा चांगली आहे. नेरळपा. उं. फू. २५००.
माद्रीड (श.) यू. खं. स्पेनची राज. मांझानारेस नदीच्या कांठीं. येथें वाजवाडे व बागा पुष्कळ आहेत. [बेटाचा भाग.
माद्रीयान (बे.) आशि. खं. द. पासि. महासाग. पोलिनिशिया
माधनपूर (श.) हिं. राजपुतान्यांत जयपूर सं. जयपूरपा. ४५ मैल.
मान (न.बे.) यू. खं. फ्रान्स दे. सेन नदीला मिळते. २ पॅरिस
मानगंज (श.) हिं. वाय. प्रां. कानपुराहून ५० मैल. [समु. बे.
मानचूरिया (प्रां.) आशि. खं. चिनई तार्तरीचा भाग
मानफिया (बे.) आफ्रि. खं. हिंदीमहासागरांत. बेट.
मानभूम (श.) हिं. बं. इ. जि. व तालुका.
मानस (सरो.) हिं. हिमालयाचे उत्तरेस तिबेटांत.
मानसा (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. ईदर सं. [संगमावर.
मानहीम (श.) यू. खं. जर्मनीत बेदन मं. ऱ्हैन व नेकर ह्यांचे
माना (गां.) हिं. वऱ्हाडांत उमरावती जि. व तालुका. रे. स्टे.
मानार (आखा.बे.) हिं. हिंदुस्थान व सिलोन ह्यांच्या मध्यें. व त्यांत या नांवाचें बेट.

मान्झानारीस(न.) यू. खं. स्पेन दे. इचे कांठीं माद्रीड श.
मानितोना (प्रां.) अमे. खं. कानडाचे राज्यांत.
मानिला (श.) आशि. खं. द. हिंदीमहासाग. फिलिपैन बेटांत.
मानूर (गां.) हिं. म. इ. निजामचे रा. नगराहून ४१ मैल.
माप (बे.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळोण ता. चिपळोणच्या खाडींत. [तलाव आहे.
मायणी (गां.) हिं. मुं इ. सातारा जि. खटाव ता. येथें मोठा
मायमयचीन (श.) आशि. खं. चिनई तार्तरींत.
मायाविरम(श.क्षे.) हिं. म. इ. पवित्र शहर व क्षेत्र आहे.
मारगरतन (पर्व.) यू. खं. स्वित्सलँदांत इगिरो सरोवराचे पूर्वेस.
मारवाड(जोधपूर) (स.) हिं. राजपु. मोठें सं.
माराकेबो (सरो.) अमे. खं. द. अमे. वेनिजुएला देशांत.
मारानाओ(श.वं.) अमे. खं. द. अमे. ब्राझील दे.
मारात्राका (श.) अमे. खं. द. अमे. वेनिजुएलांत.
मारास (न.) यू. खं. दान्युब नदीला मिळणारी नदी.
मारिट्झा (न.) यू. खं. तुर्कस्तानांत. इचे कांठीं आद्रियानोपल श. अर्किपेलेगोला मिळते.
मारितेन (पर्व.) यू. खं. स्वित्सलँदांत अल्प पर्वताचा नागमोडीसारखा जिर्नीवासरोवरा जवळील भागाचें नांव.
मारियाना (बे.) आशि.खं. द. पासि. महासा. पोलिनिशीयाचा भाग.
मारिशस (बे.) आफ्रि. खं. पूर्वेस भूमध्यसमु. येथें साखर व ऊस उत्तम होतो.
मारोवा (न.) यू. खं. दान्युब नदीला मिळणारी नदी.
मार्कंडेय (न.) हिं. मुं. इ. बेळगांव जि.
मार्की (गां.) हिं. वऱ्हाडांत उमरावती जि.

मार्किसास | मार्किसा (बे.) आशि. खं. द. पासि. महासा. पोलिनिशीयाचा भाग.

मार्ताबान (श.) हि. ब्रह्मदे. पेगूचे द. मार्ताबान प्रां. सालवीन नदीचे कांठीं. ह्याचे जवळ याच नांवाचें अखात.

मार्तिनीक (बे.) अमे. खं. उत्तर अमे. जवळ वेस्टइंडिज बेटांत. हें फ्रेंच लोकांचे ताब्यांत.

मार्मोरा (समु.) यू. खं. तुर्कस्तान व आशि. खं. तुर्कस्तान ह्यांमध्यें

मार्लेश्वर (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

मार्शल (बे.) आशि. खं.द. पासि. महासा. मैक्रोनेशिया बेटांचे समुदायाचा भाग कारोलैन बे. पूर्वेस.

मार्सेल्स (श.बं.) यू. खं. फ्रान्सांत मोठें व प्रसिद्ध बंदर.

मालकमपेठ (श.) हिं. मुं इ. सातारा जि. जावळी ता. मालकम साहेबानें वसविलेली.

मालखेड(मलखेड) (श.) हिं. निजामचे रा.

मालगुंड (श.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. रत्नागिरी. ता.

मालडा (श. बं) हिं. बं. इ. बंगालच्या उपसागरावर.

मालता (श.कि.) यू. खं. इताली दे. सिसिली बे. द. इंग्लिशांचे ताब्यांत.

मालदह (श.) हि. बं. इ. जि. व तालुका.

मालदीव (बे.) हिं. द. हिंदिमहासाग. ह्यास पोवळ्यांची बेटें म्हणतात.

मालदो (न.) यू. खं. दान्यूब नदीला मिळते.

मालदोनादो (श.) अमे. खं. द. अमे. युराग्वे दे.

मालधा (गां.) हिं. बं. इ. मोंगिरपा. ४६ मैल.

मालपूर (गां) हिं. मुं. इ. खानदेश जि. पिंपळनेर ता. येथें जाजमें तयार होतात. २ गुजराथ प्रां. ईदर सं.

मालव (सं. दे.) हिं. माळव्यांत नेमाड व इंदूर ह्या प्रांतांचें पूर्वीचें [नांव.
मालवण (श. बं.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. तालुका.
मालवाडा (श. बं.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. ता.
मालाड (गां.) हि. मुं. इ. ठाणे जि. साष्टी ता.
मालीनहेद (भू.) यू. खं. अयर्लंदांत. [पाराची पेंठ.
मालें (श.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. पन्हाळे पेट्यांत. ग्या-
मालेगांव (श.) हि. मुं. इ. नाशिक जि. मोसम नदीचे कांठीं. येथें लष्करची छावणी असते. भुईकोट किल्ला आहे.
मावलीपूर (श.) हि. मुं. इ. उत्तर अर्काटांत. येथें प्राचीन देवळें व कोरींव लेणीं आहेत.
मावळ (प्रां.) हिं. मुं. इ. पुणे जि. पश्चिम सह्याद्रीचे माथ्यावर. तालुक्याचें ठिकाण खडकाळें.
मास(म्यूज) (न.) यू. खं. हालंद व बेलजम यांतून जाऊन जर्मन समु. मिळते. कांठीं रातरदाम आहे.
मासकितो (श.) अमे. खं. उ. अमे. मध्यअमे. निकाराग्वेजवळ.
मासाचूसेत (प्रां.) अमे. खं. उ. अमे. युनैतेद स्तेतसमध्यें. यात बोस्तन श.
मासिक (बे.गां.) आफ्रि. खं. हिंदीमहासा. २ वाय. प्रां. लखनौपा. १७ मं. गोमती नदीवर.
मासिडोन (प्रां.) यू. खं. ग्रीनदे. येथील राजा अलेक्झांडर धि ग्रेत ह्याने हिंदुस्थानावर इ. स. पू. ३२७ वे वर्षी [केली.
मासेकईओ (श.) अमे. खं. द. अमे. वेनिझुएलांत.
मास्क (सरो.) यू. खं. अयर्लंदांत. मायो व गाळवे ह्यांमध्यें.
मास्को (श.) यू. खं. रशियाची जुनी राज. मास्को नदीचे कांठीं,

माहाड (श.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. ता.

माहापाड (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. खेडा जि.

माहामू (गां.) हिं. हिमालयाचे शिखर उं. ९१४० फूट. येथें चिनी धर्तीवर बांधिलेलें शिवालय आहे.

माहिजी (गां.) हि. मुं. इ. खानदेश जि. पाचोरे ता. येथें पौष शु. १५ पा. तीन महिने मोठी यात्रा भरते. रे. स्टे.

माही (श.) हि. म. इ. मलबार किनाऱ्यावर फ्रेंचांचें.

माहीम (श.) हि. मुं. इ. ठाणे जि. तालुक्याचे ठिकाण.

माहुली (श.गां.) हि. मुं. इ. सातारा जि. कृष्णेच्या कांठीं. येथे वेण्या कृष्णेस मिळते. २ ठाणे जि. शहापूर येथें किल्ला असून पेट आहे.

माहुधवार (गां.) हिं. वाय. प्रां. गाझीपूर पर. गाझीपुरापा. ४९मैल.

माहूर (श.) हि. निजामाचे रा. महाराष्ट्र देशाची सरहद्द. पायने नदीवर

माळदांड (डों.) हि. मुं, इ. नगर जि. संगमनेर ता. उत्तरेस.

माळवा (प्रा.) हि. नर्मदेच्या उत्तरेस मुलूख. इंदूर, भोपाळ. धार, देवास, रतलाम वगैरे सं. आहेत तो, यात अफू गहूं पुष्कळ होतो.

माळशिरस (गां.घा.) हि. मुं. इ. पुणे जि. जुन्नराजवळ घाट आहे.

माळेगांव (गां.) हि. वऱ्हाडांत अकोला जि.

मिओसन (सरो.) यू. खं. नार्वेत. [समुद्राचे कांठीं.

मिग्रेलिया (प्रां.) आशि. खं. रशियान ट्रान्सकाकेशियांत काळ्या

मिचिगान (सरो.) अमे. खं. उ. अमे. युनैटेड् स्टेट्समध्यें कानडाचे राज्यांतील सरोवराजवळ.

मिचंच (सामु.) यु. खं. स्कातलंद. व लुईज बेट ह्यांमध्यें.

मिझर (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. नंदूरबार ता.

मिरबाब (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. देवगडता. २ नदी साळसीचे पूर्वेस डोंगरांतून निघून या गांवाजवळ [मिळते.

मिट्टलवर्ग (बं.) हिं. द. लंकेच्या उत्तरेस.

मिटोळा (न.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. सुरत जि.

मिडवे (न.) यु. खं. इंग्लंदांत तेम्स नदीला मिळते.

मिढोला (न.) मिटोळा पहा.

मिथनकोट (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. सिंधुनदीवर मोठें व्यापाराचें ठिकाण. येथें पंचनद सिंधूस मिळतो.

मिद्नापूर (श.) हिं. बं. इ. मिद्नापूर प्रां.

मिना (न.) हिं. मुं. इ. पुणे जि. जुन्नर ता. मून घोडनदीस मिळते. कांठीं नारायणगांव आहे.

मिनांम (न.) आशि. खं. सयाम दे. कांठीं सयाम व बांकोक हीं शहरें. सयामचें अखातांत मिळते. [मध्यें.

मिनाय (सामु.) यु. खं. इंग्लंदांत कोर नार्वेन व अँगलसी ह्याचे

मिनी (न.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. गायकवाडचे राज्यांत.

मिनीम (मरा.) अमे. खं. द. अमे.

मिनोर्का (बे.) यु. खं. स्पेनच्या द. भूमध्यसमुद्रांत.

मिन्दोरो (बेटसमु.) आशि. खं. पूर्वेस ह्याच बेटाजवळ.

मियाको (श.) आशि. खं. जपान दे. निफोनबे. येथे धर्माध्यक्ष [राहतो.

मियागंज (श.) हिं. वाय. प्रां. लखनौपा. १४ मैल.

मियागांव (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. गायकवाडचे रा.

मियानी (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. हैदराबाद जि. हैदराबाद-पा. तीन कोस. येथें इंग्लिश व अमीर ह्यांची स. १८४३ त लढाई.

मियामीर (श.) हिं. पं. इ. लाहोराजवळ लष्करची छावणी.

मियावरम (श.) हिं. म. इ. त्रिचनापल्ली प्रां.

मिरगड (श.) हिं. पं. इ. भावलपूर सं.

मिरज (श.) हिं. मुं. इ. द. महाराष्ट्रदे. पटवर्धन ह्यांचें सं.

मिरजगांव (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कर्जत ता.

मिरझापूर (श.) हिं. बं. इ. कटकपा. ३० मैल. पूर्वेस. २ वाय. प्रां. गंगेच्या कांठीं जि. सुपीक प्रदेश येथें आंबे पुष्कळ होतात. साखर चांगली होते.

मिरझी (गां.) हिं. म. इ. उत्तरकानडा प्रां. येथे किल्ला आहे.

मिरत(ट) (श.) हिं. वाय. प्रां. जि. येथें लष्करची छावणी.

मिरपूर (श.) हिं. मुं. इ. सिंधप्रां. शिकारपूर जि. व तालुका. २ गुजराथ प्रां. कराची जि. तालुका.

मिऱ्या (गां.डो.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. रत्नागिरी. ता.

मिलफर्डहेवन (श.बं.) यु. खं. इंग्लंदांत वेल्समध्यें.

मिलन (श.) यु. खं. इटालींत.

मिलाज (पर्व.) आफ्रि. खं. अबिसिनियांत.

मिलान (श.) यु. खं. इतालींत लांबर्दी प्रां.

मिलार (सरो.) यु. खं. स्वीदन दे.

मिसुरी (गां.) हिं. हिमालयावर चांगल्या हवेचें ठिकाण.

मिसिसिपी (न.) अमे. खं. उ. अमे. युनैतेदस्तेत्समध्यें मोठी नदी. मेक्सिकोच्या अखातास मिळते. लां. मै. २४००.

मिसौरी (न.) अमे. खं. उ. अमे. राकीपर्व. निघून १५०० मैल जाऊन मिसिसिपी न. मिळते.

मुकटी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. धुळें ता.

मुक्तागिरी (डो.गां.) हिं. वऱ्हाडांत एलिचपूर जि. येथें जैनांचीं देवा- [लयें आहेत.

मुखेड (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. येवलें ता.

मुगी (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. शेवगांव ता. गोदावरीचे कांठीं. [मैल.

मुघर (गां.) हिं. वाय. प्रां. गोरखपूर प्रां. गोरखपुराचा. १८

मुचकुंदी (न.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता. तून निघून पूर्णगडाजवळ मिळते. येथें इला पूर्णगडची खाडी [म्हणतात.

मुजफरगड (श.) हिं. पं. इ. जि.

मुजफरनगर (श.) हिं. वाय. प्रा. जि. येथें कागदाचीं कलमदानें, पेट्या, करंडे करून त्यावर नक्षीकाम करितात.

मुजफरपूर (श.) हिं. बं. इ. तिरहुतचा. २० मैल.

मुझर्क (श.) आफ्रि. खं. सहारावाळवंटांत शहर.

मुटला (बं. श.) हिं. बं. इ. बंगालच्या उपसागरावर.

मुटाट (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. देवगड ता.

मुठा (न.) हिं. मुं. इ. पुणे जि. मावळ ता. तून निघून पुण्याचे उत्तरेस मुळेस मिळते.

मुडकी (श.) हिं. पं. इ. येथें शिक व इंग्लिश यांची लढाई स. १८४५. लाहोरच्या द. ४४ मै.

मुडावद (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सिंदखेड ता. पांझरा नदीचे कांठीं.

मुतवारीमस्कल (बे.) हिं. बं. इ. चितगांवच्या दक्षिणेस.

मुदेबिहाळ (श.) हिं. द. महाराष्ट्र देशांत विजापूर जि. ता.
मुद्रा (श.बं.) हिं. मुं. इ. कच्छ सं.
मुधोळ (सं.श.) हिं. द. महाराष्ट्र देशांत बेळगांव जि. हें घोरपडे ह्यांजकडे आहे.
मुनवळी (श.) हिं. मुं. इ. बेळगांव जि.
मुरगुई (श.) हिं. ब्रह्मदेशांत. तेनासरीम प्रां. चे दक्षिणेस.
मुरगुड (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. कागल जहागिरींत.
मुरगोड (गां.) हिं. मुं. इ. बेळगांव जि.
मुरडें (गा.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. खेड ता.
मुरबाड (श.) हिं. मुं. इ. ठाणे जि. ता.
मुरवारा (गा.) हिं. मध्यप्रां. जबलपूर जि. ता.
मुरवी (सं. श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. काठेवाडांत मचु नदीवर.
मुरवें (गां.) हिं. मुं. इ. ठाणे जि. माहीम ता.
मुरादाबाद (श.) हिं. वाय. प्रां. जिल्हा व तालुका गंगेवर. लाख भरलेली नकशीची पितळेची भांडीं करितात.
मुरार (श.) हिं. सिंद्याचे राज्यांत ग्वाल्हेरजवळ. येथें ल. छा-
मुरूड (श.) हिं. मुं. इ. जंजिरा सं. तालुक्याचें गांव. [वणी.
मुर्तिजापूर (श.) हिं. वऱ्हाड प्रां. उमरावती जि. ता. रे. स्टे. इकडून तूप चांगलें व पुष्कळ बाहेर जातें. [ह्यांच्या खाणी.
मुर्शिया (प्रां. श.) यू. खं. स्पेन देशांत. ह्यांत तांबें, लोखंड, शिसें
मुर्शिदाबाद (श.) हिं. बं. इ. जि. व ता. भागीरथीचे कांठीं. ही मुराज उद्दवल्याची राजधानी होती. नीळ व रेशीम ह्याचा व्यापार चालतो. बेद्रीकाम उत्तम [होतें.
मुलगुंद (गां.) हिं. मुं. इ. धारवाड जि.

मुलताई (गां.) हिं. मध्य प्रां. बेतुल जि. या गांवाजवळून तापी नदी निघाली आहे. अफू व गूळ यांचा व्यापार.

मुलतान(मल्ली) (श.) हिं. पं. इ. जि. चिनाब नदीवर. ल. छावणी. हस्तीदंती चुडे व जाळीचें काम चांगलें होतें.

मुल्हेर (गां.कि.) हिं. मुं. इ. नाशिक जि. बागलाण ता. मोसम नदीचे कांठीं. उद्धवस्वामींची समाधि आहे.

मुल्हेरगड (गां.) हिं. माळव्यांत होळकराचे राज्यांत निमच्या. १० मैल.

मुशी (न.) हिं. निजामचे राज्यांत कृष्णा नदीस मिळते. कांठीं हैदराबाद शहर आहे.

मुसाड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. खेड ता.

मुळगुंद (गां.) हिं. मु. इ. धारवाड जि.

मुळशी (गां.) हिं. मुं. इ. पुणे जि. हवेली ता. पेटा आहे. टाणे पौड येथें असतें.

मुळा (न.) हिं. मुं. इ. पुणे जि. मावळ ता. तून पुण्याजवळ मुठेस मिळते. व पुढें दोन्ही भीमानदीस रांजणगांवाजवळ मिळतात. २ नगर जि. अकोले ता. तून पाचे गांवाजवळ प्रवरेस मिळते.

मेकल (डों) हिं. मध्य. प्रां. मंडला जि.

मेकलन बुर्गस्वेरीन (श.सं.) यू. खं. जर्मनींत सं.

मेकलनबुर्ग स्ट्रेलीट्झ (सं.) यू. खं. जर्मनींत सं.

मेकलीन (मेक्लीन) (श.) यू. खं. बेलजम दे. जाळीदार कापड व तागाचीं वस्त्रें यांकरितां प्रसिद्ध. [चिनांत.

मेकयांग (कांबोज) (न.) आशि. खं. इंडियन चायनांत कोचीन-

मेक्रान (प्रां.) हिं. मुं. इ. सिंधदेशाचे पश्चिमेस. [बेटसमूहांत.
मेक्रोनेशिया (बे.) आशि. खं. द. पासि. महासा. ओशिआनियाचे
मेग्रा (न.) हिं. बं. इ. ही सुर्मानदीस मिळाल्यावर तिला
मेघेलीन (श.) यू. खं. इतालींत. [हेंच नांव आहे.
मेजन (अखा.) यू. खं. रशियाच्या उत्तरेस.
मेज्म (श.) यू. खं. जर्मनींत मोसेले नदीचे कांठीं.
मेझन (न.) यू. खं. रशियांत आर्तिक महासागरास मिळते.
मेडवे (श.) हिं. ब्रम्हदे. इरावतीचे कांठीं.
मेडलाक (न.) यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरमध्यें.
मेडस्टोन (श.) यू. खं. इंग्लंदांत केंटमध्ये मिड्वे नदीवर.
मेढे (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. जावली ता.
मेणवली (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. वाई ता. हें नानाफडणविसाचे जाहागीरगांव.
मेत्रोन (श.) अमे. खं. उ. अमे. साजुआन नदीचे कांठीं.
मेदितेरीअन(समु.) भूमध्य समुद्राचें नांव.
मेदिनीपूर (श.) हिं. बं. इ. जि. व तालुका.
मेनाडो (श.) आशि. खं. द. सेलीबीज बे.
मेमदाबाद (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. खेडा जि. तालुका.
मेमेनसिंग (श.) हिं. बं. इ. ब्रह्मपुत्रेच्या कांठीं.
मेरीलान्ड (प्रां.) अमे. खं. युनैतेदस्तेत्स प्रां. यांत मु. श. बालतीमोर.
मेरिओनेथ (प्रां.) यू. खं. वेल्समध्ये.
मेरिदा (श.) अमे. खं. उ. अमे. मेक्सिको दे.
मेरु (गां.) हिं. पं. इ. कुनावर प्रां. जुळा व सतलज यांचे संगमावर. येथें द्राक्षें उत्तम होतात.

मेरुलिंग (डों.) हिं. मुं. इ. सातार जि. वेण्णा नदीच्या पूर्वे-
• कडून सातारा तालुक्यांतील सह्याद्रीचा फांटा.

मेरोई (श.) आफ्रि. खं. न्युबिया देशांत नैल नदीवर.

मेलबोर्न (श.) आशि. खं. द पाश्चि. महासा. आस्ट्रेलियांत
व्हिक्टोरिया भागाची राजधानी

मेलीन (पर्व.) आशि. खं. चिनांत. [हूर आहे.

मेलेस (न.) आशि. खं. तुर्कस्तानांत. इचे कांठीं स्मर्ना श.

मेवड (प्रां.) आशि. खं. कंदाहार व हेलमंद नदी ह्यांचे मध्यें.

मेवाड(उदेपूर) (सं.) हिं. राजपु. मोठें सं.

मेवात (प्रां.) हिं. राजपुतान्याचे उत्तरेस प्रां.

मेवासी (सं.प्रां.) हिं. मुं. इ. रेवाकांठा सं. २ नर्मदा नदीचे द-
क्षिण अंगास आहे तो प्रांत. [णारी नदी.

मेशवो (न.) हिं. मुं. इ. गुजराथेंत साबरमती नदीस मिळ-

मेशी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. कळवण ता.

मेश्वा (न.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. खेडा जि.

मेसिना (बं.सामु.) यु. खं. इताली व सिसिली बेट ह्यांमध्यें.

मेक्सिको (दे.श.) अमे. खं. मध्य अमे. देश. या देशाजवळ याच
नांवाचे अखात.

मेहकर (श.) हिं. वऱ्हाडांत बुलढाणें जि. तालुका.

मेहमदाबाद (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. खेडा जि. तालुका.

मेहरूण (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. जळगांव ता.

मेहुणबारें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. चाळीसगांव ता. गिर-
णेच्या कांठीं धुळ्याहून चाळीसगांवचे वाटेवर.

मेहेकरी (न.) हिं. मुं. इ. नगर जि. नगर ता. तून जामखेड ता. शिवा नदीस मिळते.

मेळघाट (श.) हिं. वऱ्हाडांत एलीचपूर जि. चिखलदरा तालु॰ क्याचें ठिकाण. येथील हवा चांगली आहे.

मैथील (दे.) हिं. नेपाळ दे. जवळ गोरखपूर आहे तो देश.

मध्रुव (दे.) हिं. आग्रा प्रांताचें पूर्वीचें नांव.

मैन (न.) यु. खं. ऱ्हैन नदीस मिळते. [खोऱ्यांत.

मैनघोल (जंगल.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. भोगावती नदीच्या

मैनपूर (प्रदे.) हिं. बं. इ. जिल्हा. व तालुका.

मैनाम (न.) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पांत असून सया॰ मद्दे. सयामचे अखातास मिळते. कांठीं बांकोक

मैमनसिंग (श.) हिं. बं. इ. जि. व तालुका. [शहर.

मैसाना (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. गायकवाडचे राज्यांत.

मोईला (श.बं.) आशि. खं. अरबस्तानांत तांबड्या समुद्राचे कांठीं.

मोकंदरा (गां.) हिं. राजपु. कोटा सं. कोटापा. १२ मैल. चं॰ बळा नदीचे कांटीं.

मोखा (श.बं.) आशि. खं. अरबस्तानांत येमेन प्रां. तांबड्यास॰ मुद्राचे कांठीं. येथें बंदर चांगलें होतें. [काण.

मोखाडे (श.) हिं. मुं. इ. ठाणे जि. शहापूर ता. पेट्याचें ठि॰

मोजगड (श.) हिं. पं. इ. भावलपूर सं. भावलपूरपा. १७ मैल.

मोजडें (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव ता. येथें मोठी यात्रा भरते.

मोजांबीक (दे.) आफ्रि. खं. पूर्व आफ्रिकेंत. देश याची राजधानी. याच नांवाचें शहर. हें पोर्तुगीज लोकांचें.

मोजेल (न.) यू. खं. न्हैन नदीला मिळते. [नांवें.

मोडनिंबें (श.सं.) हिं. मुं. इ. सोलापुर जि. मिरजकर पटवर्ध-

मोदेना (प्रां.श.) यू. खं. इटालींत द्राक्षें, रेशीम, मध होतो.

मोनस (न.) हिं. हिमालयांतून निघून ब्रम्हपुत्रा नदीस मिळते.

मोबील (श.) अमे. खं. द. अमे. कोलंबियांत.

मोमबाज (श.) आफ्रि. खं. पूर्व आफ्रिकेंत जांजिबारमध्ये.

मोर (न.) हि. मं. इ. भावलपूर सं. तून निघून भागीर-थीस मिळते. २ खानदेश जि. सावदे ता. तून मुसावळ ता. तापीस मिळते.

मोरगांव (श.) हिं. मुं. इ. पुणे जि. पुरंदर ता. कऱ्हा नदीचे कांठीं श्रीगणपतीचें प्रसिद्ध स्थान.

मोरकंबे (अखा.) यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरचे वायव्येस.

मोरगिरी (गा.कि.) हिं. मुं. इ. सातारा जि. पाटण ता.

मोरटका (श.) हि. मध्यप्रां. नेमाड जि. ता.

मोरबत (पर्व.) हि. पुणे जि. भोर सं. या टेकडीवर शिवाजीनें स. १६४६ त रायगड किल्ला बांधिला. [णेस.

मोरबात (श.बं.) आशि. खं. अरबस्तानांत हैद्रामौंत प्रां. दक्षि-

मोरवणे (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळोण ता.

मारवाड (सं.) हि. मुं. इ. गुजराथेच्या उत्तरेस राजपुतान्यांत.

मोरबी (सं. श.) हिं. मुं. इ. गुजराथ. प्रां. काठेवाडमध्यें हालार विभागांत.

मोरवें (गां.) हि. मुं. इ. सातारा जि. वाई ता. खंडाळें पेट्यांत.

मोरसा (गां.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. अमदाबाद जि. येथें साबू, कांच करण्याचे कारखानें आहेत.

मोरा (श.) हिं. मुं. इ. सिंधप्रां. हैदराबाद जि. तालुका.

मोरार (श.) हिं. मध्यप्रां. सिंधाचे राज्यांत ग्वाल्हेरीजवळ इंग्लिशांचे शहर. येथें छावणी आहे.

मोरिया (द्वीप.) यू. खं. ग्रीसदेशांत.

मोरे (अखा.) (सरो.गां.) यू. खं. स्कानलंदांत. २ हिं. मुं. इ. ठाणे जि. पनवेल ता.

मोरोकाईबो (अखा.) अमे. खं. द. अमे. वेनिजुएलाचे उत्तरेस.

मोरोको (सं.श.) आफ्रि. खं. बार्बरी सं. एक सं. आहे.

मोरोविया (प्रां.) यू. खं. आस्ट्रियाचा भाग. [शियांत विक्टोरियांत.

मोर्नंबे(फिन्सलांद) (सं.) आशि खं. द. पासि. महासाग. आस्ट्रेलि-

मोर्न (पर्व.) यू. खं. अयर्लंदांत

मोर्ना (न.) हिं. वऱ्हाड प्रां. अकोला जि. पूर्णानदीस मिळते.

मोर्शी (गां.) हिं. वऱ्हाडांत उमरावती जि. व ता.

मोलका (बे.) आशि. खं. द. पासि. महासा. मलाशियांत.

मोलदावा (न.) यू. खं. दान्यूब नदीला मिळते.

मोलेदोवया (श.) यू. खं. तुर्कस्तानांत रुमेनियांत.

मोलमेन (श.बं.) आशि. खं. इंदियन चायनांत ब्रह्मदे. आसाम प्रां. तेनासरीमपरग. आम्हर्स्त भागांत. येथें चित्रें [चांगलीं काढितात.

मोवाड (श.) हिं. मध्य प्रां. नागपूर ज़ि.

मोसम (न.) हिं. मुं. इ. नाशिक जि. बागलाण ता. साल्हेरडोंगरांतून येऊन माळेगांवाजवळ गिरणेस मिळते.

मोसल (श.) आशि. खं. तुर्कस्तानांत तैग्रीस नदीचेकांठीं. कुर्दीस्तानमध्ये.

मोहखेड (श.) हिं. मध्यप्रां. छिंदवाडा जि. येथें तुपाचे बुधले [होतात.

मोहगांव(मोहतूर) (गां. शि.) हिं. मध्यप्रां. छिंदवाड जि. सातपुड्याचें शिखर.

मोहनपूर (सं.श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. महिकाठा एजन्सींत.

मोहना (न.) हिं. मुं. इ. तापीस मिळणारी नदी.

मोहपाडा (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. पनवेल ता.

मोहळ (श.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. माढें ता.

मोहाडी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. दिंडोरी ता. [होतात.

मोहाळी (गां.) हिं. मध्यप्रां. भंडारा जि. येथें लुगडीं चांगलीं

मोहोपानी (गां.) हिं. मध्य प्रां. नरसिंगपूर जि. येथील कोळशाच्या खाणी प्रसिद्ध आहेत.

मंगरूळ (श.) हिं. वऱ्हाड प्रां. वासीम जि. तालुका. [प्रसिद्ध.

मंगलूर (श.बं.) हिं. म. इ. मलबार किनाऱ्यावर व्यापाराक.

मंगळवेढें (श.) हिं. मुं. इ. द. महाराष्ट्रदे. बेळगांव जि. सांगली सं. तालुक्याचें गांव. भीमेच्या कांठीं पंढरपुराजवळ. येथें पंढरीभक्त दामाजीपंत साधु होऊन गेला.

मंचर (मरो.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. २ पुणे जि. खेड ता. येथें लुगडीं चांगलीं होतात.

मंचोबो (श.) हिं. ब्रह्मदे. पूर्वीची राजधानी.

मंजराबाद (गां.) हिं. म. इ. म्हैसूर सं. सेरिंगपट्टा. ७२ मैल. येथें डोंगरावर किल्ला आहे.

मंडणगड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता. पेटा असे.

मंडले (श.) हिं. ब्रह्मदेशाची. राजधानी इरावतीचे कांठीं.

मंडलेश्वर (श.) हिं. मध्यमां. माळव्यांत नर्मदेच्या कांठीं महूच्या द. ३० मै. शेवटचा पेशवा मालकम साहेबास शरण गेला. स. १८१८.

मंडळा(ला) (श.) हिं. मध्यमां. माळव्यांत नर्मदेच्या कांठीं. येथें मोटा धबधबा आहे. येथें पंचरशी धातूंची भांडीं उत्कृष्ट होतात.

मंडोट (कि.) हिं. पं. इ. सरहिद्द मां. सतलज नदीवर. [ता.

मेंढापुर (गां.सं.) हिं. मुं इ. सोलापुर जि. मिरजकराचें. मोडनिंब

मंदावर (श.) हिं. वाय. मां. येथें कागदाची कलमदानें, पेट्या, डबे करून त्यावर नकशी करितात.

मंद्रुळ (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. पाटण ता.

मंद्रूप (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. व ता.

मांझिगर्लें (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. शिरोळे पेट्यांत.

मांगेतुंगे (डों.) हिं. मुं. इ. नाशिक जि. कळवण ता. येथें जैन-लोकांचीं देवालयें आहेत.

मांचुरीया (प्रां.) आशि. खं. चिनई तार्तरीत.

मांचेस्टर (श.) यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरमध्यें इरवेंत नदीवर. हें कापसाचे वस्त्राकरितां प्रसिद्ध.

मांजरा (न.) हिं. मुं. इ. निजामाचे राज्यांत गोदावरीस मिळते.

मांजरोद (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. शिरपूर ता. तापीचे कांठीं.

मांटओहोळ (न.) हिं. मुं. इ. नगर जि. पारनेर ता. वासुदेव गांवाजवळून निघाली आहे व इला येथें तीनशें हात

मांटगोमरी (श.) यू. खं. इंग्लंदांत. [उंचीचा धबधबा आहे.

मोंगीर (श.) हिं. बं. इ. गंगेच्या कांठीं मोठा किल्ला आहे.
मोंझ (भू.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. कराचीचे पश्चिमेस.
मोंतओलिंपस (शिख.) यू. खं. तुर्कस्तानांत उंच शिखर.
मोंतपारनेसस (पर्व.) यू. खं. ग्रीस दे. उंच पर्वत.
मोंतयार्क (पर्व.) आफ्रि. खं. द. पासि. महासा. आल्जेरियांत.
मोंतरे (श.) अमे. खं. उ. अमे. युनायतेद्स्टेतसमध्यें.
मोंत रोजा (शिख.) यू. खं. स्वित्सर्लंदांत अल्पपर्वताचें.
मोंतसेंतगोथाई (शिख.) यू. खं. स्वित्सर्लंदांत अल्पपर्वताचें.
मृत (समु-सरो.) आशि. खं. तुर्कस्तानांत पालस्तैन प्रां. यांत मासे वांचत नाहींत, व झाडें होत नाहींत. पाणी जड घट्ट आहे त्यावर चालतां येतें.
म्यान (बे.) यू. खं. इंग्लंदांत ऐरीस समुद्रांत.
म्युज (न.) यू. खं. बेल्जममध्ये जर्मन समुद्रास मिळते.
म्युनीक (श.) यू. खं. जर्मनींत बवेरियाची राज. नायझर नदीचे कांठीं.
मुंद्रा (श.बं.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां कच्छ सं.
मुंबई (श.बं.) हिं. मुं. इ. मुख्य शहर, हें पोर्तुगीज राजानें स. १६६१ त इंग्लिशांस आंदण दिलें. तेव्हां फार थोडी वस्ती होती. हल्लीं वस्ती सु. सात लक्ष असून हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें सुधारणेनें, व्यापारानें श्रेष्ठ आहे. पृथ्वीवरील सर्व देशांतील लोक येथें आहेत. गवरनर साहेब येथेंच राहातात. अनेक यंत्रें, पाण्याचे नळ, ग्यासचे दिवे, गिरण्या, छापखाने, वगैरे कारखाने, व्हिक्टोरिया

टरमिनस, राजाबाई टावर, दीपस्तंभ, पोष्टऑफीस, हैकोर्ट, क्राफर्डमार्केट, कालेजें वगैरे मोठ्या व सुंदर अशा इमारती पाहण्यासारख्या आहेत. रेल्वे स. १८५३ त सुरू झाली. स. १८९३ त मुसलमान व हिंदूंत मोठा दंगा झाला.

मेंढोशी (गा.) हि. मुं. इ. सातारा जि.

मेंदोसेना (भू.) अमे. खं. द. अमे. युनैतेद्स्तेत्समध्यें.

मोंगलपूर (श.) हि. पं. इ. दिल्ली शहराजवळच मोंगल लोकांनीं वस्ती केली त्यांचे नांव.

मोंगोलीया (प्रां.) आशि. खं. चिनई तार्तरीचा पूर्वेकडील प्रांत. चीनदेशाचे उत्तरेस.

मोंगीर (श.) हि. बं. इ. बहार प्रां. जि. भागीरथीच्या कांठीं. येथें सुपारीच्या लांकडाचे डागिने करतात.

मांडवण (गां.) हि. मुं. इ. नगर जि. श्रीगोंदे ता.

मांडवी (श.व.न.) हि. मुं. इ. कच्छ सं. २ पुणे जि. जुन्नर ता. नदी. ३ सुरत जि. तापीच्या कांठीं बंदर.

मांडवे (गां.जाहा.) हि. मुं. इ. नगर जि. संगमनेर ता. हे होळकराचे दिवाण पळशीकर ह्यांचे.

मांडूलगड (गां.) हि. राजपु. उदेपूर सं. अजमीर पा. ५६ मैल.

मांतिनीग्रो (दे.) यु. खं. तुर्कस्थानाचे दक्षिण व पश्चिम अंगास.

मांत्रीआल (श.) अमे. खं. उ. अमे. कानडाचे रा. सेंतलारेन्स व ओटावा ह्यांचे संगमावर.

मांतुवा (श.) यु. खं. इतालींत.

मांतेविडीओ (श.) अमे. खं. द. अमे. युराग्वे दे.

मांदाड (बं.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. माणगांव ता. मिठाचा मोठा व्यापार.

मांद्रेक (भू.) आशि. खं. अरबस्तानांत दक्षिणेस.

मांधाता(ओंकार) (क्षे.) हिं. मध्यप्रां. नेमाड जि. नर्मदेच्या कांठीं १२ ज्योतिर्लिंगांपैकीं एक पवित्र स्थान. येथील वस्ती डोंगराचे उतरणीवर वसलेली आहे. येथील राजा कोळी जातीचा आहे.

मिंदोरा (समु.) आशि. खं. द. पासि. महासाग. मिंदोरो बेटाजवळ.

मुंगेली (श.) हिं. मध्यप्रां. बिलासपूर जि. ता.

मुंडगांव (गा.) हिं. वऱ्हाडांत अकोला जि. अकोला ता.

मुंडगी (श.) हिं. मुं. इ. धारवाड जि.

मुंडी (गां.) हिं. मध्यप्रां. नेमाड जि. बऱ्हाणपूर ता.

म्हशेळें (श.) हिं. मुं. इ. जंजिरा सं. तालुक्याचें ठिकाण.

म्हसदी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. पिंपळनेर ता.

म्हसवड (श.) हिं. मुं. इ. सातार जि. माण ता.

म्हसवें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. अमळनेर ता.

म्हसाईपाठार(जंगल.)हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. वारणानदीचे स्रोऱ्यांत.

म्हसावद (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. जळगांव ता. गिरणेच्या कांठीं रे. स्टे.

म्हसें (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. मुरबाड ता.

म्हाडाळ (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.

म्हानारादेव (डों.) हिं. मुं. इ. नगर जि. शेवगांव ता. यांतून ढोरा नदी निघाली आहे.

म्हासरें (जंग.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. वेदगंगेच्या कांठीं.

ह्युली (श.) हिं. मध्यप्रां. चांदा जि. तालुका.

होरवाडा (प्रां.) हिं. राजपुतान्यांत. [बाळापूर.

हौस (न.) हिं. वऱ्हाडांत अकोला जि. बाळापूर ता. काठीं

हौसूर (सं. श.) हिं. म. इ. हें हिंदुराजाचे ताब्यांत असून यांत श्रीरंगपट्टण रा. श. आहे. यांत सुर्मा, सिसें, कच्ची चांदी, काफी हीं होतात. येथें हैदर व टिपू हे पराक्रमी राजे होऊन गेले. यांनीं इंग्लिशां-बरोबर पुष्कळ लढाया केल्या. हैदर स. १७८२ त व टिपू स. १७९९ त मेला.

य.

यज्द (श.) आशि. खं. इराणांत इराक अरबी प्रां. येथें गालीचे चांगले होतात.

यदो (श.) आशि. खं. जपान दे. निफोन बेटांत.

यद्रो (गां.) हि. ब्रह्म दे. चिंडवन नदीपा. १८ मैल.

यमकन (गां.) हिं. मुं. इ. बेळगांव जि.

यमगें (गां.) हि. मुं. इ. कोल्हापूर सं. कागल जहागिरींत.

यमुना (न.) हि. हिमालयांतून जमनोत्रीपा. निघून प्रयागा जवळ गंगेला मिळते. कांटीं आग्रा, दिल्ली शहरें आहेत. लां. ८६० मै.

यरुशलेम (श.) आशि. खं. तुर्कस्तानांत पालस्तैन प्रां. येथें येशू ख्रिस्त जन्मला व मेला. याच्या शकास आज १८९५ वर्षें झालीं.

यवतमाळ (श.) हि. वऱ्हाडांत, वणी जिल्ह्याचें मुख्य ठिकाण. व्यापार मोठा चालतो.

यत्रतेश्वर (डो.) हिं. मुं. इ. सातारा जि. साताऱ्याजवळ डोंगर आहे, व त्यावर श्रीयवतेश्वराचे स्वयंभू स्थान आहे.

यवनदेश (दे.) आशि. खं. यलख, बुखारा वगैरे देश.

यशवंतगड (कि.) हिं. मुं. इ. रत्नागिरी. जि. राजापूर ता.

यसो (बे.) आशि. खं. जपानदेश चार बेटे मिळून झाला आहे; त्यांपैकी एक बेट.

यक्षु(आक्सस) (न.) आशि. ख. तार्तरींत हिंदुकुश प. निघते. व आरल समु. मिळते. इचे कांठचे प्रदेश सुपीक आहेत. इचे कांठी माणकें वैडूर्य, सोने हीं सांपडतात. इचे दक्षिणेस समर्कंद शहर. [तीरावर.

याकुत्स्क (श.) आशि. ख. रशियांत लेना नदीच्या डाव्या

यानान (श.) हिं. म. इ. कारोमांडल किनाऱ्यावर गोदावरीचे मुखाजवळ राजमहेंद्रीजवळ फ्रेंचांचे. [शिखर.

याब्लानाय(शिख.) आशि. खं. रशिया दे. द. अलनाई पर्वताचे

यामौंथ (श.) यु. खं. इंग्लंदांत नारफाक प्रा. येअर नदीवर.

यार्क (श.) यु. खं. इंग्लंदात यार्क प्रा. औसनदीवर.

यार्कंद (न.श.) आशि. खं. चिनईतार्तरांत.

याकयांग (न.) आशि. ख चिनईतार्तरांतून जाऊन लोबनोर सरोवरास मिळते. [निकाम स. १४७१ त जन्मला.

यार्न (गा.) यु. खं. मस्यादे. विस्तुला नदीचे कांठी. कोप-

यावरी (न.) अमे. ख. द. अमे, आमाझोन नदीला उजव्या बाजूनें मिळते.

यावल (श.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सावदे ता.

यासी (श.) यु. खं. रुमानियामध्ये.

यी (प्रां.) हिं. ब्रह्मदे. तेनासरीम प्रां. यांत इमारती लांकूड

युकातान (द्वीप.) अमे. ख. उ. अमे. मेक्सिको दे. [उत्तम होतें.

युदीया (श.) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पांत सयामदे. जुनी

युननान (प्रां.) आशि. खं. चीन दे. [राजधानी.

युननानफू (श.) आशि. खं. चीनदे. युनान प्रां.

युनल्यांग (न.) आशि. ख. चीनदेशांत पिहीहो नदीस मिळते.

युनानी (बे.समु.) यु. खं. ग्रीसदेशाचे पूर्वेस बेटसमूह. [णतात.

युनैतेदस्तेत्स (दे.) अमे. खं. उ. अमेरिकेत. स्वतंत्र संस्थानास म्ह-

युफ्रातीस (न.) आशि. खं. तुर्क. तारस पर्वतांतून निघून बसरा
शहराजवळ तैग्रिस नदीला मिळते. लां. १७०० मै.

युबेओन (न.) अमे. ख. उ. अमे. कामश्चाटकाचे समु. मिळते.

युमेडांग (पर्व.) हिं. पू. ब्रह्मदेश. ईशान्येस.

युराग्वे (दे.न.) अमे. खं. द. अमे. युराग्वे देशांत नदी.

यूकोन (न.) अमे. ख. उ. अमे. युनैतेदस्तेत्समध्यें.

यूनलींग (पर्व.) आशि. खं. चिनांत.

यूरोप (ख.) यु. खं. आशियाखंडाचे पश्चिमेस.

यूसेल (बे.) यु. खं. बाल्टिक समुद्रांत.

ये (प्रां.) हिं. ब्रह्मदेशांत.

येजिन (अग्ना.) आशि. ख. रुसदे. पूर्वेस.

येज्द (श.) आशि. खं. इराणांत येथें पार्शी लोकांचे मुख्य
गुरु राहतात. गालीचे चांगले होतात.

येनसी (न.) आशि. खं. रशियांत अलताई पर्वतांतून निघून
येनीसियीचे अखातास मिळते. लां. २९०० मै.

येनूर (गा.) हिं. म. इ. मंगळुराहून २२ मेल.

येबी (न.) हिं. मध्यप्रां. महानदीला मिळणारी नदी.

येमीने (भू.) यू. खं. तुर्कस्तानांत आद्रिआतिक समुद्रांत.

येमेन (प्रां.) आशि. खं. अरबस्तानांत पश्चिमेकडील विभागाचें नांव.

येरंड (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. शेवगांव ता. येथें पागोटीं [चांगलीं होतात.

येरंडोल (श.) हिं. मुं. इ. खानदेश. जि. तालुक्याचें ठिकाण. येथें खर्ची कागद चागले होतात.

येलाघरी (गां.) हिं. म. इ. सालेम प्रां. [तालुका.

येल्लापूर (श.) हिं. मुं. इ. द. महाराष्ट्र दे. उत्तर कानडा जि.

येवत (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. भिमथडी ता.

येवती (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. माढें ता.

येवलें (श.) हिं. मुं. इ. नाशिक. जि. येवलें ता. येथें जरीकांठी पीतांबर, पैटण्या उत्तम होतात. इ. स. १८९३ त हिंदुमुसलमानांन दंगा.

येवी (न.) हिं. व. इ. महानदीला मिळणारी नदी.

येशवंतगड (कि.) यशवंतगड पहा.

येसो (श.बे.) यसो पहा.

योत्रुफु (श.) आशि. खं. चिनांत गोकनाक प्रां.

योम (पर्व.) हिं. ब्रह्मदे. व असाम यांतील रांगेचें नांव.

योमादुरंग (पर्व.) हिं. ब्रह्मदे. पेगूच्या पश्चिमेस. [काठीं.

यंब्रु (बं.श.) आशि. खं. अरबस्तानांत तांबड्या समुद्राचे

यंबो (श.बं.) आशि. खं. अरबस्तानांत हेजाझ प्रां. मदीना पा. १०० मैल.

यांगसेकयांग (न.) आशि. खं. चीनदे. क्वोई पर्वतांतून निघून पीत समु. मिळते. लां. २९०० मैल.

यांदाबु (गां.) हिं. ब्रम्हदे. येथें इंग्लिश व ब्रह्मी राजा यांचा स. १८२६ त तह झाला.

र.

रइत (श.बं.) आशि. इराणांत काळ्या समुद्राचे कांठीं.

रक (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. [१६ मैल.

रघुगड (श.) हिं. मध्य प्रां. सिंद्याचे राज्यांत गुणा शहरापा.

रटलंद (प्रां.) यु. खं. इंग्लंदांत. [जवळ.

रडतोंडी (गां.) हिं. मुं. इ. टाणे जि. शहापूर ता. कासारे घाटा-

रतनगड (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. अकोले ता. येथून प्रव- रानदी निघाली आहे.

रतनपूर (श.) हिं. मध्यप्रां. बिलासपूर जि.

रतलाम (सं.श.) हिं. मध्यप्रां. माळव्यांत इंदूरच्या पश्चिमेस.

रतींबर (श.कि.) हिं. राजपु. जयपुराहून ७५ मैल बुंदी संस्था- नचे हद्दीवर.

रत्नपूर (श.) हिं. ब्रह्म दे. आवा शहराचें पूर्वीचें नांव.

रत्नागिरी (श.बं.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. व ता. येथें शिल्प- शाळा आहे त्यांत काम चांगलें तयार होतें. मुं- बईपा. १०० मैल दक्षिणेस या जिल्ह्यांतील लोक तीक्ष्ण बुद्धीचे आहेत.

रधनपूर (सं.श.) हिं. गुजराथ प्रां. [जाहागीर.

रनाळें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. नंदुरबार ता.

रने (गां.) हिं. मध्यप्रां. दमोह जि.

रशियनतार्तरी(दे.) आशि. तार्तरीचा जो भाग रशियानें घेतला तो.

रशिया (दे.) आशिया व यूरोप ह्या दोन्ही खंडांत उत्तरेक-डील देश. ह्याच्यामध्ये उराल पर्वत आहे.

रसाळगड (कि.) हि. मु. इ. रत्नागिरी जि. खेड ता.

रस्त (श.) आशि. इराण दे. कास्पिअनसमु. काठी.

रहातगड (श.) हि. मध्यप्रां. सागर जि. येथे चरमी जोडे व दुसुनी कापड होते.

रहिमतपूर (श.) हि.मु.इ. सातारा जि. कोरेगांव ता.

रहेली (गा.) हि. मध्यप्रांत. सागर जि. येथे गुळाचा कारखाना.

राई (गा.) हि. मुं. इ. ठाणे जि. साष्टी ता. घोडबंदराजवळ. मिठाचा मोठा व्यापार आहे. [१६००० मै.

राकी (पर्व.) अमे. खं. उत्तर अमे. द. उत्तर आहे. लां.

राक्सबर्ग (प्रा.) यू. ख. स्कातलंदांत.

राचडेल (श.) यू. ख. इंग्लंदांत लंकेशायरमध्ये रोच नदीवर.

राजकोट (श.म.) हि. मुं. इ. गुज. प्रा काठेवाडमध्ये. येथे राजकुमार कालेज आहे. २ रत्नागिरी. जि. माल्वण ता. किल्ला.

राजखेडा (गा.) हि. राजपु. धोलपूर स.

राजगड (गा.कि.) हि. व. इ येथे दगडी कोळशांच्या खाणी आ-हेत. २ मुं. इ. पुणे जि. भोर स. हा किल्ला तोरणा किल्ल्याच्या आग्नेयीस दोन कोसावर स. १६४६ त शिवाजीने बांधिला. [ग्जरा्थांत.

राजपिंपळा (स.श.डों.) हि. मु. इ. गुज. प्रा. पश्चिमेस रेवाकांठा

राजपुताना (प्रा.) हि. मु. इलाख्याचे उत्तरेस व पंजाब इ. दक्षिणेस. हा बहुतेक वालुकामय प्रदेश आहे. हा रजपुत लोकांचा देश. ह्यांत पुष्कळ. सं. आहेत.

राजपुरी (गां.खा.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. जंजीरा जंजिऱ्याजवळ.

राजमहाल (श.) हिं. बं. इ. येथें दगडी कोळशांच्या खाणी आहेत. गंगानदीवर. स. १८५५ त सांथल लोकांचें बंड.

राजमहेंद्री (श.बं.) हिं. म. इ. पूर्वकिनाऱ्यावर गोदावरीचे कांठीं जि.

राजमाची (कि.) हिं. मुं. इ. पुणें मावळ ता.

राजवाडी (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

राजशाही (गां.श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. काठेवाडांत. २ बं. इ. जि.

राजसेज (पर्व.) हिं. मुं. इ. नाशिक जि. दिंडोरी ता. येथून बाणगंगा निघते. येथील दगड फार कडक.

राजापूर (श.बं.) हिं.मुं.इ. रत्नागिरी जि. २ नाशिक जि. येवलें ता.

राजीम (श.) हिं. मध्यप्रां. महानदीचे कांठीं. रायपूर जि. येथें लाखेचा व्यापार.

राजुरी (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. जुन्नर ता.

राजूर (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. अकोलें ता. येथें तांदुळांचा व्यापार मोटा चालतो.

राजेगांव (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. भिमथडी ता.

राठेहाळी (गां.) हिं. मुं. धारवाड जि. कोड ता.

राडनार (गां.) यु. खं. इंग्लंडांत नेल्समध्यें.

राणीगंज (श.) हिं. बं. इ. येथे कोळशांची खाण आहे.

राणेबिदनूर (श.) हिं. मुं. इ. धारवाड जि. तालुका.

रातरदाम (श.) यु. खं. हालंड दे. म्यूज नदीचे कांठीं मोठी व्यापाराची जागा.

रानंजन (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. बार्शी ता.

राध (भू.) यु. खं. स्कातलंदांत उत्तरेस.

राथलीन (बे.) यू. खं. अयर्लंद बे. उत्तरेस.

राधनपूर (सं.श.) हिं. मुं. इ. गुज.प्रां. पालनपूर एजन्सींत.

रानमळा (गां.) हिं.मुं. इ. खानदेश जि. धुळें ता. जहागीर गांव.

रापर (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. कच्छांत.

रापती(राप्ती)(न.) हिं. अयोध्या प्रांतांतून भागीरथीस मिळते.

रामगड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. मालवण ता. येथें नरम दगडाची भांडीं चांगलीं होतात. २ छोटा-नागपूरचे उत्तरेकडील प्रांतांत. ह्यास हजारी बाग म्हणतात. ३ मध्यप्रां. मंडला जि ता.

रामगंगा (न.) हिं. बं. इ. भागीरथीला मिळणारी.

रामघाट (घा.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. वेंगुर्ले ता.

रामटेक (श.डो.) हिं. मध्यप्रां. नागपूर जि. येथे विड्याचीं पानें चागलीं व पुष्कळ होतात.

रामदुर्ग (सं.श.) हिं. मुं. इ. बेळगांव जि. पूर्वेस भावे ह्यांचें.

रामनगर (श.) हिं. पं. इ. चिनाव नदीचे कांठीं. २ मध्यप्रां. मंडला जि. ही गोंड राजाची राजधानी होती.

रामनद (सं.श.) हिं. म. इ. मदुरा पर.

रामनाथ (ग.) हिं. म.इ. वेगा नदीचे कांठीं मधुरा जि.

रामपायली (ग.) हिं. मध्यप्रां. भांडारा व संबळपूर जि.

रामपूर (सं.श.) हिं. वाय. प्रां. रोहील खं. कोशिला नदीवर.

रामरी (बे.) हिं. ब्रम्हदे. आराकान प्रां. पश्चिमेस बेट.

रामाचासेतू (पूल.) हिं. हिंदुस्तान व सिलोन बेट ह्यांच्या मध्यें.

रामापूर (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. औंध सं.

रामास (भू.) हिं. मुं. इ. गोव्याचे द. मलबार किनाऱ्यावर.

रामेश्वर (गां.) हिं. मुं. इ. कळवण ता. २ हिं. दक्षिणेस बेट.

रायगड (कि.सं.) हिं. मुं. इ. सह्याद्रि पर्वतांत. कुलाबा जि. महाड ता. येथे श्रीशिवाजी महाराजांनीं आपल्यास स. १६७४ त राज्याभिषेक करवून घेतला. व स. १६८० त ते गुडघीरोगानें स्वर्गवासी झाले. २ मध्यप्रां. संबळपूर जि. सं. श. ता.

रायचूर (श.) हिं. म. इ. निजामचे रा. कृष्णा व तुंगभद्रा ह्या नद्यांचे दुआबांत. रे. स्टे.

रायपाटण (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता.

रायपूर (श.) हिं. मध्यप्रां. जि. छत्तीसगड प्रां. कोसाज कापड, लाख, कापूस यांचा व्यापार. ल. छावणी. २ खानदेश जि. पिंपळणेर ता.

रायबरेली (श.) हिं. अयोध्याप्रां. गोमतीच्या काठ्यावर जि.

रायबाग (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. शिराळे पे.

रायमुंदे (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. साष्टी ता.

रायमोहो (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता. निजामाचे राज्यांतील गांव.

रायरी (कि.) हिं. मुं. रत्नागिरी जि.

रायसिंगपूर (सं.श.) हिं. मुं. इ. खानदेश जि. तळोदे ता. लगत.

राल्दंग (शिख.) हिं. हिमालयाचे शिखर. [दीचे उगमाजवळ.

रावणऱ्हद (सरो.) हिं. हिमालयाचे उत्तरेस तिबेटांत सतलज न॰

रावर (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. कच्छ सं.

रावळपिंडी (श.) हिं. पं. इ. उत्तरेस काबूलचे वाटेवर. झेलम् व सिंधु ह्यांमध्यें ल. छावणी, जि.

रावी (न.) हिं. पं. इ. कुलू प्रांतांतून निघून चिनावला मिळते. लां. ४५० मैल.

रावेर (श.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सावदे. ता. पेटा आहे.

राशिवडें (गां.) हि. मुं. इ. कोल्हापूर सं. बावडा जहागिरीत.

राशीन (श.) हिं. मुं. इ. नगर जि. कर्जत ता. जहागीर.

रासअलहद (भू.) आशि. खं. अरबस्तानचे पूर्वेस.

रासगाल (भू.) आशि. खं. सिलोन (लंका)च्या दक्षिणेस.

रासमौज (भू.) हि. मुं. सिंध प्रां. कराचीचे पश्चिमेस.

राहतगड (गां.) हि. मध्यप्रां. सागर जि.

राहतें (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव ता.

राहुरी (श.) हिं. मुं. इ. नगर जि. तालुका. येथे धान्याचा व्यापार चालतो.

राक्षसभुवन (श.) हि. मोगलाईत (निजामचे राज्यांत) गोदावरीचे [कांठीं.

राळेगांव (गां.) हि. वऱ्हाडांत वर्धा जि.

राळेरास (गां.) हि. मुं. इ. सोलापूर जि. बार्शी ता.

रिओकार्डोबा (श.) अमे. खं. द. अमे. अर्जेंटाइन देशांत.

रिओकोलोराडो (न.) अमे. खं. उ. अमे. युनैटेडस्टेटसमध्ये.

रिओदेजानेरो (श.) अमे. खं. द. अमे. ब्राझील देशाची राजधानी.

रिओदेलाप्लाता (खाडी.) अमे. खं. द. अमे. युराग्वेमध्ये.

रिओपारा (श.खाडी.) अमे. खं. द. अमे. ब्राझीलच्या ईशान्येस.

रिचमंड (रा.श.) अमे. खं. उ. अमे. युनैटेडस्टेटसमध्ये. व्हर्जिनिया

रिडींग (श.) यु. खं. इंग्लंडांत बर्कस प्रा. केनेट नदीवर. [प्रां.

रिधपूर (गां.) हि. वऱ्हाडांत उमरावती जि.

रिबल (न.) यु. खं. इंग्लंडांत लंकेशायर मध्यें.

रियाद (श.) आशि. खं. अरबस्तानांत मध्य प्रांतांत नज्द.पर.
रिओग्रांददेलनार्त (न.) अमे. खं. उ. अमे. युनैतेद्स्तेतसमध्यें. लां. १४०० मैलं.
रिसवड (गां.) हिं. वऱ्हाड प्रां. वाशिम जि. येथें रंग चांगला
री (सरो.) यु. खं. अयर्लंदांत.
रीस (सरो.) यु. खं. अयर्लंद दे. [होतो.
रुआतन (बे.) अमे. खं. मध्य अमे. हांदुरासच्या उपसागरांत.
रुआंग (श.) यु. खं. फ्रान्स दे.
रुई (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. कागल जहागिरींत.
रुकडी (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. वडगांव ता.
रुकमावती (न.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. कच्छ सं.
रुगेन (बे.) यु. खं. जर्मनीचे नाव्यांत बाल्तिक समु.
रुडकी (श.) हिं. वाय. प्रां. सहारणपूर पर. येथे शिल्पशास्त्र शिकविण्याची शाळा आहे.
रुद्रपूर (श.) हिं. वाय. प्रां. रुद्रपूर प्रां. [मिळाली आहे.
रुपनारायण (न.) हिं. बं. इ. छोटानागपूर प्रां. नून हुगळी नदीस
रुपर्टलांद (प्रां.) अमे. खं. हडसनबेच्या हद्दींतील. [नांव.
रुमशाम (श.) यु. ख. तुर्कस्तानांत कान्स्तांतिनोपल शहराचें
रुमानिया (दे.) यु. खं. तुर्कस्तानांत. उत्तरेस देश.
रुर्कीस (श.) हिं. वाय. प्रां. मिरत प्रा.
रुस (दे.) आशिया व युरोपखंडांतील उत्तरेकडील देश.
रेचनादोआब(प्रां.) हिं. पं. इ. रावी व चिनाब यांचे मधील प्रदे
रेटेरबुद्रुक (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. कऱ्हाड ता. [शाचें नांव.
रेडी (गां कि.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. वेंगुर्लें ता.

रेणावें	(गां.)	हिं. मुं. इ. सातारा जि. खानापूर ता.
रेदरिवर	(न.)	अमे. खं. मिसिसिपी नदीला मिळते. लां. १५०० [मैल.
रेन्फ्रू	(प्रां.)	यू. खं. 'स्कातलंदांत.
रेमरा	(गां.)	हिं. मध्यप्रां. संबळपूर जि.
रेराखोल	(सं.श.)	हिं. मध्यप्रां. संबळपूर जि. [तयार होतात.
रेवदंडा	(श.कि.)	हिं. मुं. इ. कुलाबा जि. येथें पीतांबर व कांट
रेवल	(श.)	यू. खं. रशिया दे. मोठें व्यापाराचें शहर.
रेवा	(सं.श.)	हिं. वाय. प्रां. बुंदेलखं. रेवा सं. वेहर नदीवर. येथें लांखेचे चुडे अनेक प्रकारचे करितात.
रेवाकाठा	(सं.)	हिं. मुं. इ. गुज. प्रां. ह्यांत पुष्कळ संस्थानें आहेत.
रेस	(भू.)	अमे. खं. उ. अमे. न्यूफौंडलांद बेटांत.
रेसिफी	(बं.)	अमे. खं. द. अमे. ब्राझील दे.
रेगा	(श.बं.)	यू. खं. रशियांत दुनानदीचे मुखाजवळ बालतिक
रैन	(न.)	हिं. यमुना नदीस मिळणारी. [समुद्राचे कांठीं.
रैमस	(श.)	यू. खं. फ्रान्स दे.
रोका	(भू.)	यू. खं. पोर्तुगाल दे. पश्चिमेस.
रोच	(न.)	यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरमध्यें.
रोजा	(पर्व.)	यू. खं. इतालींत पूर्वेस.
रोटावद	(गां.)	हिं. मुं. इ. खानदेश जि. जामनेर ता.
रोण	(श.)	हिं. मुं. इ. द. म. धारवाड जि. ता.
रोदस	(बं.)	आशि. खं. तुर्कस्तानचे पश्चिमेस भूमध्यसमु.
रोन(=होन)	(न.)	यू. खं. फ्रान्स दे. लापनचे अखातास मिळते. लां.
रोपळे	(गां.)	हिं. मुं. इ. सोलापूर जि. करमाळें ता. [४९०मै.
रोम	(श.)	यू. खं. इतालींत राजधानी, तैबरनदीचे कांठीं.

रोमानिया (भू.) आशि. खं. इंदियनचायनांत मलायाचे दक्षिणे.
रोराईमा (पर्व.) अमे. खं. द. अमे वेनिजुएलांत.
रोरी (श.) हिं. मुं. इ. सिंधप्रां. सिंधूचे कांठीं.
रोसेता (श.) आफ्रि. खं. इजिप्त दे. नैल नदीच्या मुखाजवळ.
रोहत (गां.) हिं. मुं. इ. काठेवाड प्रां.
रोहिलखंड (प्रां.) हिं. वाय. प्रां. रोहिले लोकांचें वस्तीस्थान.
रोहें (श.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. रोहें ता. गांव.
रंकाळें (तला.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. कोल्हापुराजवळ.
रंगपूर (श.) हिं. बं. इ. रंगपूर जि. ब आसाम प्रां. सद्याचे नैर्ऋत्येस.
रंगावल (न.) हिं. मुं. इ. खानदेश जि. पिंपळनेर ता.
रंगावा (न.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचे रा. डभई महालांत.
रंगून (श.) हिं. ब्रह्मदे. पेगूप्रां. इरावर्तीचे कांठीं मोठें व्यापाराचें शहर, इंग्लिशांनीं स. १८२५ त घेतलें. या प्रांतांत गिरज्याचें काम (कांवच्यांचें मखर ७०।८० फूट उंचीचें सात मजली) उत्तम करितात. चित्रें उत्तम करितात. [मोठा धबधबा आहे.
रंधगांव (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. अकोले ता. येथें प्रवरेस
रांगणा (कि.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. सह्याद्रिपर्वतावर व रत्नागिरीकडेस जातांना घाट.
रांची (श.) हिं. बं. इ. छोटानागपूर प्रां. मुख्य शहर.
रांजणगांव (गां.) हिं. मुं इ. खानदेश जि. चाळीसगांव ता. २पुणें जि. भिमथडी ता. येथें मुळामुठा भीमेस मिळते.

१ नगर जि. पारनेर ता. ४ पुणें जि. शिरूर ता. येथें श्रीगणपतीचें प्रसिद्ध स्थान आहे.

रांटा (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. इडर सं.

रांदेर (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. सुरत जि. तापीचे कांठीं.

रेंदाळ (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. वडगांव ता.

ऱ्हीस (श.) यु. खं. फ्रान्स दे.

ऱ्हेंद (न.) हिं. वाय. प्रां. यमुना नदीस मिळणारी नदी.

ऱ्हैन (न.) यु. खं. जर्मनी व हालंद या देशांत असून जर्मन-समु. मिळते. लां. ७६० मै.

ऱ्होटसगड (कि.) हिं. वं. इ. शहाबाद प्रां. सोननदीवर हें ठिकाण रामचंद्राचा मुलगा कुश ह्यानें शोधून काढिलें असें म्ह. हें रमणीय स्थान आहे.

ल.

लऊळ (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. माढे ता.

लक्सेमबुर्ग (सं.श.) यु. खं. फ्रान्स आणि जर्मनी ह्यांचे मध्यें सं.

लखदीव (बे.) हिं. म. इ. मलबार कि. पश्चिमेस.

लखनादऊन (गां.) हिं. मध्यप्रां. शिवनी जि. ता.

लखनोटी (श.) हिं. वाय प्रां.सहारणपूर प्रां.सहारपूर पा.१५मैल.

लखनौ (श.) हिं. अयोध्या प्रां. ची राजधानी गोमती नदीचे कांठीं जि. सुंदर इमारती आहेत. मातिचीं चित्रें बिदरीकाम व जाळीचेंकाम होतें.

लखपट (श.बं.) हिं. गुज. प्रां. कच्छ सं.

लखरीकांग (श.) हिं. वाय. प्रां. अलाहाबाद जि. ता.

लखटुंग (श.) हिं. सिक्कीमचे रा. टिस्टा नदीवर.

लखीमपूर (श.) हिं. नेपाळच्या सरहद्दीवर.

लग (न.) यू. खं. इंग्लंदांत.
लगासी (सं.श.) हिं. वाय. मां बुंदेलखंडांत. काल्पीपा. ८६ मैल.
लछमनपूर (श.) हिं. वाय. मां. औध पर. सुलतानपुराहून २२ मै.
लडनो (श.) हिं. राजपुतान्यांत अजमीरपा. ८९ मैल.
लडवो (श.) हिं. पं. इ. सरहिंद मां. कर्नूलपा. २२ मैल.
लदक (प्रां.) हिं. पं. इ. पूर्वी हा प्रांत तिबेटांत मोडत होता.
ललगूण (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. खटाव ता.
ललडंग (श.) हिं. वाय. प्रा. बिजनूर मां.
ललतपूर (श.) हिं. बं. इ. जि. व तालुका.
ललितापट्टण (श.) हिं. नेपाळ सं. फटमांडूपा. ७८ मैल.
लवेल (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. खेड ता.
लष्कर (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. मालेगांव पा. २ मैल. येथें फौजेची छावणी आहे. २ ग्वाल्हेरनजीक इंग्लिशांची छावणी आहे त्यास म्हणतात.
लस (श.) आशि. खं. बलुचिस्तान दे.
लहर (गां.) हिं. वाय. प्रां. काल्पीपा. ५० मैल. [पश्चिमेस.
लहसा (प्रां.) आशि. खं. अरबस्तानांत इराणी अखाताचे
लहेर्ना (श.) हिं. वाय. मां. फत्तेपूर मां. गंगेच्या कांटीं.
लळींग (गां.कि.) हिं. मुं.इ.खानदेश जि. धुळें ता. धुळ्यापा. ६ मैल.
लाओ (दे.) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पांतील देश.
लाकआ (सरो.) यू. खं. स्काटलंदांत.
लाकते (सरो.) यू. खं. स्काटलंदांत.
लाकनेस (सरो.) यू. खं. स्काटलंद दे.
लाकमोरे (सरो.) यू. खं. स्काटलंद दे.

लाकरूस (सरो.) यू. खं. स्कातलंदांत.

लाकलोमंद (स.) यू. खं. स्कातलंदांत.

लाकशीन (सरो.) यू. खं. स्कातलंदांत.

लाकसा (श.) हिं. बं. इ. बरसत प्रां. कलकत्यापा. ४० मैल.

लाख (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. राहुरी ता. येथें प्रवरा- नदीस मोठा बंधारा आहे.

लाखपूर (श.) हिं. यं. इ. मिनपुर प्रां. मिनपुरीपा. २० मैल.

लाखलान (न.) आशि. खं.पू. पासिफिक महासा. आलेलिशियांत मरे नदीला मिळते.

लाखुरा (गां.) हिं. पं. इ. मुलतानपा. ५० मैल.

लागवण (श.) हिं. बं. इ. भागलपूर प्रां. राजमहाल पा. ५८ मैल.

लाग्विल्हास (भू.) आफ्रि. खं. दक्षिणेस.

लाट (गां.) हिं. मुं. इ.-कोल्हापूर सं. आजरें ता.

लाटघर (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.

लाताक (श.) आफ्रि. खं. दक्षिणेकडील मध्य आफ्रिकेंत.

लाथी (सं.) हिं. मुं. इ. गुज प्रां. काटेवाड प्रां. गोहिलवाडा विभागांत. [चौ. मै. ६१२०.

लादोगा (सरो.) यू. खं. रशिया दे. गोड्या पाण्याचें. याचें क्षेत्र

लाद्रोन (बे.) आशि. खं. पू. पासि. महासा. मैक्रोनेशियापैकीं एक बेटसमूह.

लान (दे.) हिं. निजामचे रा. वेरूळ आहे तो प्रदेश.

लानचांग (श.) आशि. खं. इंदियनचायनांतील सयाम दे. उ. रेसलाओ देशांत.

लानचौ (श.) आशि. खं. चिनांत यांगसी नदीचे कांठीं.

लान्सेस्टन (श.) यू. खं. इंग्लंदांत कार्नवाल प्रां. टमार नदीवर.

लाप्लाता (दे.न.) अमे. खं. द. अमे. न. लां. २१५० मै.

लापलांद (प्रां.) यू. खं. रशियांत उत्तरेकडील प्रांत. हा नापीक प्रदेश येथें नेहमीं बर्फ पडतें; यांत दोन महिन्यांचा एक दिवस व दोन महिन्याची एक रात्र होते.

लापाज (श.) अमे. खं. द. अमे. बोलिव्हियामध्यें.

लापू एब्ल (श.) अमे. खं. मेक्सिको दे.

लापोएनेला (श.) अमे. खं. मेक्सिको दे.

लाप्रनित्स (पर्व.) यू. खं. आस्ट्रियांत.

लाबुआन (प्रां.) आशि. खं. द. पासि. महासाग. बोर्निओ बेटांत.

लाब्रेदोर (बे.) अमे. खं. हडसनच्या सामुद्रधुनीवर.

लायनबुर्ग (प्रां.) यू. खं. देन्मार्क दे.

लायन्स (न.) आशि.खं.पू.पासि.महासा. आस्ट्रेलेशियांत. पासिफिक महा. मिळते.२ यू. खं. फ्रान्स दे. दक्षिणेस.

लार (श.) आशि. खं. इराणी अखातावर प्रां. व शहर.

लारखान (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. शिकारपूर जि. [संगमावर.

लालकनिओ (श.) हिं. पं. इ. दुआब प्रां. चिनाब व जेलम ह्यांचे

लालगंज (श.) हिं. बं. इ. तिरहूत प्रां. दिनापूरपा. १८ मैल. २ वाय. प्रां. मिरझापूरपा. २० मैल. ३ औद. पा. २१ मैल.

लालग्ला (न.) हिं. बं. इ. ओरिसा प्रां. बंगालच्या उपसा. मि-

लालपाडी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. निफाड ता. [ळते.

लालपूर (श.) हिं. मुं. इ. काठेवाडांत बडोद्यापा. २०० मैल. २ वाय. प्रां. मुरादाबादपा. १९ मैल. ३ कानपूरपा. ५९ मैल. ४ परनीपा. ३१ मैल.

लालसोभा (श.) हिं. राज. जयपूर सं. जयपूरपा. ४१ मैल.
लाली (श.) हिं. पं. इ.
लालू (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. पक्करपा. ६० मैल.
लालेरफोर्ड (श.) हिं. वाय. प्रां. बोलंद पर. मिरतपा. ६१ मैल.
लासलगांव (गां.) हिं.मुं.इ. नाशि. जि. निफाड ता. धान्यांचा व्या. पार. येथें भुईकोट किल्ला आहे. [१८०३.
लासवारी (गां.) हिं. वाय. प्रां. मथुरा प्रां. इंग्लिश व मराठे ल.
लासा (श.) आशि. खं. मोठे तिबेट दे. राजधानी सानपू न- दीचे कांठीं. [नळें आहे.
लासूर (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. चोपडे ता. तेथेंच मोठें
लासेन (श.) यू. खं. स्वित्सर्लंदमध्यें टेकडीवर उत्तम शहर.
लाहूल (प्रां.) हिं. पं. इ. ईशान्येस.
लाहेग (गां.) यू. खं. हालंद दे.
लाहोग (भू.) यू. खं. फ्रान्स दे. उत्तरेस.
लाहोर (श.) हिं. पं. इ. रावीच्या कांठीं. येथें शिकराजाची मुख्य गादी होती. जि. ले. ग. राहतात. रण- जितसिंगाचें थडगें आहे. येथें कुसनगारी काम उत्तम होतें. अनेक प्रकारचे मातीचे सर्प करितात.
ली (श.न.) हि. पं. इ. लदक सं. २ यू. खं. अयर्लंडांत.
लिएज (श.) यू. खं. बेलजम दे. येथें घड्याळें चांगलीं होतात.
लिजर्ड (भू.) यू. खं इंग्लंद दे. दक्षिणेकडेस.
लिजोन (श.) अमे. खं. मध्य अमेरिकेंत.
लिडन (बे.) हिं. दक्षिणेस लंकेच्या उत्तरेस.
लिडस (श.) यू. खं. इंग्लंदांत यार्क प्रां. एअर नदीचे कांठीं.

लितलबेल्हत (सामु.) यू. खं. देनमार्क दे. फ्यूनेन व स्लेसविकमध्यें.

लिथ (श.बं.) यू. खं. स्कातलंदांत एदिंबरो प्रां.

लिथज (श.) यू. खं. आस्त्रिया दे. दान्यूब नदीचे कांठीं.

लिदस (श.) यू. खं. इंग्लंद दे. येथें लोंकरीचीं वस्त्रें चांगलीं होतात.

लिद (न.) आफ्रि. खं. नैल नदीला मिळणारी.

लिनस्तर (प्रां.) यू.खं.अयर्लंद दे.

लिन्यांती (श.) आफ्रि. खं. मध्य आफ्रिकेंत.

लिपडी (सं.) हिं. पं. इ. काठेवाड प्रां. झालावाड भागांत.

लिपारी (बे.) यू. खं. अतलांतिक महासाग. स्पेनच्या राजाकडे.

लिफी (न.) यू. खं. अयर्लंद दे. इचे कांठीं दब्लिन शहर. अयरिश समु. मिळते.

लिबा (न.) आफ्रि. खं. जांबोजीला मिळते.

लिबिया (मैदान) आफ्रि. ख. सहारा वाळवंटाचे पूर्वेस.

लिमपो (न.) आफ्रि. खं. द. आफ्रिकेंत.

लिमफिअर्द (अखा.) यू. खं. देनमार्क दे. जतलंदमध्यें.

लिमरिक (श.) यू. खं. अयर्लंद दे. शानन नदीचे कांठीं.

लिमा (श.) अमे. खं. द. अमे. पेरू दे.

लिया (गां.) हिं. पं. इ. सिंधसागर दुआबमध्ये.

लियोंग (श.बं.) यू. खं. फ्रान्स दे. आरमाराची जागा

लिवरपूल (श.) यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरमध्यें मर्सी नदीवर.

लिवर्दएलंद (बे.) अमे. खं. उ. अमे. लगत्याच वेस्तइंडीज बेटांत.

लिवांट (समु.) यू. खं. द. भूमध्यसमुद्राचा पूर्वभाग.

लिवेज (श.) यू. खं. इंग्लंदांत सक्सेस प्रां. उस नदीवर.

लिस्बोन (श.बं.) यू. खं. पोर्तुगाल दे. राजधानी. स. १७५५ त धरणीकंपानें पडलें होतें. तेगस नदीचे कांठीं.

लीज (न.) यू. खं. बेलजममध्यें. लोखंडी व कापडाचे कामाकरितां प्रसिद्ध.

लील (श.) यू. खं. फ्रान्स दे. कारखान्याकरितां प्रसिद्ध.

लुईस (बे.) यू. खं. अतलांतिक महासागरांत.

लुकू (बे.) आशि. खं चीन दे. पूर्वेस.

लुच्यू (बे.) आशि. खं. चीन दे. पूर्वेस चिनई समुद्रांत.

लुजोन (बे.) आशि. खं. द. पासि. महासाग. ओशियानिया बेट समुदायांत फिलिपैन बेटांत.

लुट्टीपूर (गां.) हिं. वाय. प्रां. मिरझापूरपा. ११ मैल.

लुदिया (सरो.) आफ्रि. खं. त्युनीस सं.

लुणावाडा (सं.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. रेवाकाटा एजन्सींत.

लुधीआ (न.) हिं. वाय. प्रां. कमाऊनपर. काळी ऊर्फ सर्जु नदीस मिळते.

लुधिआना (श.) हिं. पं. इ. जि. येथें उत्तम शाली होतात.

लुनी (नं.) हिं. राजपु. अजिमगडाजवळ पुष्कर सरोवरांतून निघून कच्छचे रणास मिळते. लां. १२० मै.

लुबेक (श.बं.) यू. खं. जर्मनींत बालतिक समुद्राचे कांठीं.

लुरिस्तान (श.) आशि. खं. इराणी अखाताचे कांठीं इराक अरबी प्रांताचे नैर्ऋत्येस.

लुल्या (सरो.) यू. खं. स्विद्नांत.

लुविनापोलपन (भू.) अमे. खं. उ. अमे. रशियन अमे. उत्तरेस.

लुशाई (सं.) हिं. बं. इ. पूर्वेस असामचे पूर्व हद्दीवर.

लुसर्न (श.) यू. खं. स्वित्सर्लंदांत लुर्धन सरोवराचे कांठीं.
लुहडी (गां.) हिं. वाय. प्रां. गाझीपूरपा. २४ मैल.
ले (श.) हिं. उत्तरेस लहान तिबेटाची राजधानी
लेओमिन्स्टर (श.) यू. खं. इंग्लंदांत सालप प्रां. लग नदीवर.
लेकगाडवा (श.) हिं. पूर्वेस आराकान प्रां. आराकानपा. २३ मैल.
लेकग्रेगरी (सरो.) आशि. खं. पू. पासि. महासाग. आस्ट्रेलेशियांत गोड्या पाण्याचें. [उद्भूत झालेलें.
लेकमंडल (श.) हिं. वाय. प्रां. जनसर पर. यमुनेच्या कांठीं
लेकमिमोगारी (गां.) हिं. नेपाळ सं. मार्कंडेयनदीवर कटमांडूपा.
लेकरकुंड (श.) हिं. बं. इ. बीरभूम पर. [६७ मैल.
लेयार्न (बं.) यू. खं. इतालींत.
लेण्याद्रि (पर्व.) हिं. मुं. इ. पुणें जि. जुनराजवळ. यांत कोरींव लेणी चांगलीं आहेत. [मैल.
लेधा (श.) हिं. बं. इ. रामगड प्रां. हजारीबागपा. ५२
लेना (न.) आशि. खं. रुस दे. अलताई पर्वतांतून निघून उत्तर महासागरास मिळते. लां. २५०० मै.
लेपसिक (श.) यू. खं. जर्मनींत हें व्यापार व विद्यालय ह्यांकरितां प्रसिद्ध.
लेपांतो (अखा.) यू. खं. ग्रीस दे. ग्रीस आणि मोरिया यांमध्यें.
लेबडोर (श.) हिं. मेघानदीच्या मुखाजवळ.
लेबानन (पर्व.) आशि. खं. तुर्कस्तानांत सिरीया प्रां.
लेबंग (श.) हिं. ब्रह्मदेशमध्यें ह्लोंग नदीच्या किनाऱ्यावर.
लेमनास (दे.) आशि. खं. तुर्कस्तानचे प. भूमध्यसमु. [ह्यांमध्यें
लेमेर (सामु.) अमे. खं. द. अमे. स्तेती व तेरादेलफुइगो बेट

लेया (श.) हिं. मुं. इ. सिंधूचे कांठीं. [मध्यसमु.
लेसबास (बे.) आशि. खं. तुर्कस्तानांत आशियामैनारचे प. भू.
लेसरआंतीलीस (बे.) अमे. खं. उ. अमे. जवळच्या वेस्टइंदीज बे.
लेह (श.) हिं. काश्मिरांत लदक प्रां.
लेहा (श.) हिं. पं. इ. सरहिंदमध्यें लुधियानापा. १६ मैल.
लेहुमा (पर्व.) आफ्रि. खं. न्युबीया दे.
लैदन (श.) यु. खं. हालंद दे. विद्यालयाकरितां प्रसिद्ध.
लैबिरीया (सं.श.) आफ्रि. खं. वरच्या गिनींत.
लोआर्किपेलागो (बे.) आशि. खं. पू. पा. महासा. पोलिनिशिया
लोआंगो (प्रा.) आफ्रि. खं. खालच्या गिनींत. [बेटसमूहांत.
लोएनदा (श.) आफ्रि. खं. प. आफ्रिकेंत.
लोएल (श.) अमे. खं. फानडाचे रा. बास्तनच्या उत्तरेस कापसाच्या व्यापाराकरितां प्र.
लोएसटाफ्ट (श.) यू. खं. इंग्लंदांत सफाक प्रां. पूर्वकिनाऱ्यावर.
लोणार (सरो.) हिं. वऱ्हाडांत बुलठाणे जि. ह्याचें पाणी खारें असून ह्यापा. अनेक प्रकारचे क्षार होतात.
लोणावळें (गां.) हिं मुं. इ. पुणें जि. मावळ ता. रे. स्टे. खंडाळे घाटाचे माथ्यावर हवा उत्तम.
लोणीकाळभर (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. हवेली ता.
लोणीभापकर (गां.) हिं. मुं. इ. पुणें जिं. भिमथडी ता. [भाईं.
लोधीखेडा (श.) हिं. मध्यप्रां. छिंदवाडा जि. येथें तांबेपितळेचीं
लोपाला (भू.) आशि. खं. रशियांत पूर्वेस कामश्चात्काचें द.
लोपेज (भू.) आफ्रि. खं. पश्चिम आफ्रिकेंत. [क्षिणटोंक.
लोफोदेन (बे.) यु. खं. नार्वेच्या ताब्यांत.

लोबनोर (सरो.) आशि. खं. चिनईतार्तरींत. यास तुरीम नदी [मिळते.
लोभी (न.) हिं. पं. इ. ब्रह्मपुत्रा नदीला मिळते.
लोलंदस (प्रां.) यु. खं. स्कातलंद दे.
लोलांद (बे.) यु. खं. देन्मार्क दे. जर्मन समुद्रांत.
लोसर (गां.न.) हिं. पं. इ. पुनी व लोसर ह्यांचे संगमावर.
लोसान (श.) यु. खं. स्वित्सर्लंदमध्यें.
लोहगड (कि.) हिं. मुं. इ. पुणे जि. मावळ ता. येथें पेशवे सरकार कैदी ठेवीत असत.
लोहदगी (श.) हिं. बं. इ. जि. व. ता.
लोहार (गां.) हिं. वाय. प्रां. बुंदेलखडांत.
लोहारीनाइग(गां.) हिं. वं. इ. गुरवळ प्रां. येथें भागीरथीस धबधवा आहे.
लोहारू (सं.) हिं. वाय. प्रां.
लोहारें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश. जि. पाचोरें ता. येथें अडकित्ते चांगले होतात.
लोही (गां.) हिं. वऱ्हाड प्रां. वणी जि. येथें गुरांचा मोठा बाजार भरतो.
लोहोणेर (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. कळवण ता. गिरणेच्या कांठीं.
लौबल (श.) अमे. खं. द. अमे. कोलंबिया दे.
लंका (बे.) हिं. दक्षिणसे ह्यास सिंहलद्वीप म्हणतात. यांत मसाल्याचे पदार्थ, खोबरें हस्तिदंत पु. होतो.
लंगूर (कि.) हिं. वाय. प्रां. कमाऊन पर. हा गुरखे लोकांनीं डोंगरावर बांधिला आहे.
लंडी (न.) हिं. पं. इ. सिंधुनदाला मिळते.
लंडन (श.) यु. खं. इंग्लंड दे. राजधानी सर्व पृथ्वींत पहिल्या प्रतीचें पहिलें शहर, येथें चाळीस लाख

वस्ती आहे. हें तेम्स नदीवर दुतर्फा वसलें आहे. ह्या नदीस मोठे असे आठ पूल आहेत. यांत भव्य व सुंदर राजवाडे, पार्लमेंट सभागृह वगैरे इमारती, पदार्थ संग्रहालयें, बागबगीचे, गोदी, यांत्रिक शक्ती वगैरेचे अनेक मोठमोठे कारखाने असून येथें पृथ्वीवरील सर्व देशांतील लोक आहेत. येथें १६$\frac{1}{2}$ तासांचा दिवस होतो.

लंदनदरी (श.बं.) यू. खं. अयर्लंदमध्यें.

लांकेशायर (प्रां.) यू. खं. इंग्लंदांत.

लांकेस्टर (श.) यू. खं. इंग्लंदांत लांकेशायरमध्यें ल्यून नदीवर.

लांगएलंद (बं.) अमे. खं. उ. अमे. युनैतेदस्तेतच्या राज्यांत.

लांगस्तोन (बे.) यू. खं. इंग्लंदच्या उत्तरेस. [नाऱ्यावर.

लांचू (श.) आशि. खं. चीनदे. होआंगहो नदीचे पूर्व कि-

लांजी (श.) हिं. मध्यप्रां. बालाघाट जि. याचे आसपास लोखंडाच्या खाणी व कळकीचें रान आहे.

लांजें (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता. येथें कांबळीं तयार होतात.

लांजेरोत (अखा.) आफ्रि. खं. बार्बरी सं. उत्तरेस.

लांटोर (बे.) आशि. खं. पू. पासि. महासाग. मसाल्याचे बेटांत.

लांडीखाना (रस्ता.) आशि. खं. अफगणिस्तानांत जातांना खैबरपासमधील फार बिकट रस्ता १२ फूट रुंदीचा व भिंतीसारखा उंच आहे.

लांडूर (गां.) हिं. हिमालय पर्वतावर हवा खाण्याचें ठिकाण.

लांदसएंद (भू.) यू. खं. इंग्लंद दे. पश्चिमेकडील टोंक.

लांबर्दीन (प्रां.) यू. खं. इताली दे.
लांबवान (श.) आशि. खं. द. पासि. महासाग. मलाशिया बेटसमूहांत बोर्निओ बेटांत.
लिंकनशायर(प्रां.) यू. खं. इंग्लंदांत. [समूहांत लुझोन बेटांत.
लिंगायन (अखा.) आशि. खं. द. पासि. महासाग. फिलिपैन बेट.
लिंपोपो (न.) आफ्रि. खं. मोझांबिकच्या खाडीस मिळते.
लिंब (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. व ता.
लेंगर (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. खानापूर ता.
ल्यार (न.) यू. खं. फ्रान्स दे. बिस्केच्या उपसागरास मिळते.
ल्युबिनजन (श.) यू. खं. जर्मनींत वर्तेंबर्गमध्यें विद्यालयाकरितां प्रसिद्ध.

व.

वजरीबाद (श.) हिं. पं. इ. चिनाब नदीचे कांठीं.
वज्रेश्वरी (गां.) हिं.मुं.इ. ठाणें जि. भिवंडी ता. येथें देवीच्या तीन मूर्ति असून जवळच उष्ण पाण्याचीं कुंडें आहेत.
वझीरगंज (गां.) हिं. वाय. प्रां. औध पर० लखनौपा. ७ मैल.
वझीराबाद (गां.) हिं. पं. इ. चिनाब नदीपा. १ मैल. येथें चिनाब नदी अर्धा मैल रुंद आहे.
वडगांव (गां.) हिं. मुं. इ. सातार जि. खटाव ता. २ पुणें जि. मावळता. येथे इंग्लिश पेशवे ह्यांची स.१७७९त लढाई झाली. ३ कोल्हापूर सं. अळते पेट्यांत.
वडगांवगुप्त (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. नगरापा. १ कोसांवर. येथून नळ बांधून नगरास पाणी आणिलें आहे.
वडनेर (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. चांदवड ता. येथें वि-

त्याचीं पानें होतात. २ वऱ्हाडांत बुलढाणे जि. रे. स्टे. ३ नाशिक जि. मालेगांव ता. मोसम न. कांठीं येथें कमोदी तांदूळ उत्तम होतात.

वडवली (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. वसई ता.

वडवाण (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. काठेवाडांत. [दरचे सं.

वडाळी (सं.श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. महिकांठा एजन्सींत ई-

वडाळीभुई (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. चांदवड ता.

वडांगळी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. सिन्नर ता.

वडीगुडम (गां.) हिं. मध्यप्रां. सिरोंच्या जि.

वडुज (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. खटाव ता.

वडुथ (गां.) हिं. मुं. सातारा जि. सातारा ता.

वडेल (गां.) हिं. मुं. नाशिक जि. मालेगांव ता. मोसमनदी. कांठीं येथें गुळ पुष्कळ होतो. [कांठीं.

वडोली (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. वाई ता. कमंडलु नदीचे

वढवाण (सं.श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. काठेवाडपर. झालवाड-

वढोदे (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. भुसावळ ता. [भागांत

वणी (गां.श.) हिं. मुं. इ. नाशिक जि. दिंडोरी ता. येथून सप्तशृंग देवीचे गडावर जाण्याचा रस्ता. २ वऱ्हाड जि. येथें कोळशांच्या खाणी आहेत.

वणोज (गां.) हिं. वऱ्हाड प्रां. एलिचपूर जि.

वना (न.) हिं. मुं. इ. धारवाड जि. वर्धा नदीला मिळते.

वरखेडें (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. दिंडोरी ता.

वरगड (सं.श.) हिं. मध्यप्रां. संबळपूर जि.

वरचागिमी (दे.) आफ्रि. खं. सेनिगांबिआचे दक्षिणेस.

वरजिनीया (प्रां.श.) अमे. खं. उ. अमे. युनायतेद्स्तेत्स प्रां.
वरणगांव (श.) हिं. मुं. इ. खानदेश जि. भुसावळ ता. रे. स्टे.
वरन (भू.) आशि. खं. द. बोर्निओ बेटाच्या पश्चिमेस.
वलजानगर (श.) हिं. म. इ. अर्काटपा. ९ कोसांवर.
वलीयांबे (न.) आफ्रि. खं. आंबीजीला मिळते.
वरवंडे (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. रत्नागिरी ता.
वरवंडी (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. राहुरी ता.
वरशिंदे (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. राहुरी ता. [अखातावर.
वराक्रुझ (बं.) अमे. खं. मध्यअमे. मेक्सिकोंत मेक्सिकोच्या
वराट (दे.) हिं. महाराष्ट्र दे. माहूर वगैरे देश.
वराड (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. मालवण ता.
वरूड (गां.) हिं. वऱ्हाड प्रां. उमरावती जि. मध्यप्रां. २ चांदा
जि. तालुका. [आहेत. चांदा जि. ता.
वरोडा (गां.) हिं. मध्यप्रां. येथें दगडी कोळशांच्या खाणी
वरोरे (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. शाहापूर ता.
वरोळी (न.) हिं. मुं. इ. ठाणें जि. पश्चिमवाहिनी.
वरंगळ(वारंगुळ)(श.) हिं. म. इ. तेलंगणच्या रा. राजधानी होती.
वर्गामो (श.) यु. खं. इतालींत.
वर्जर (भू.) आफ्रि. खं. सेनिगांबियाचे पश्चिमेस.
वर्तेबर्ग (श.) यु. खं. जर्मनींत.
वर्दे (भू.) आफ्रि. खं. पश्चिमेस.
वर्दा (भू.) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पाचे पूर्वेस.
वर्धनगड (डों.कि.) हिं. मुं.इ. सातारा जि. शंभुमहादेवाच्या ओळींत.
वर्धा (श.न.) हिं. मध्यप्रां. जि. व बैतुलचे जवळ मुलताईचे

डोंगरांतून निघून गोदावरीस मिळते. कांठीं देवलवाडा लां. १५० मै. २ धारवाड जि. तुंगभद्रेला मिळते. [वर.

वर्शघाट (घाट.) हिं. मुं. इ. ठाणें जि. महाडास जाण्याचे रस्त्या.

वऱ्हाड (प्रां.) हिं. मुं. इ. चे पूर्वेस व निजामचे राज्याचे उत्तरेस. हा सुपीक प्रांत इ. स. १८५३ त निजामानें इंग्लिशांस दिला. ह्याचे सहा जिल्हे केले असून ते हैदराबादच्या रेसिडेन्टच्या ताब्यांत आहेत.

वसई (श.) हिं. मुं. इ. ठाणें जि. तालुका येथे चिमणाजी आपानें स. १७३९ त पोर्तुगीज लोकांवर जय मिळविला. दु. बाजीरावानें इ. १८०२ त इंग्लिशांबरोबर तह केला. मोठा किल्ला आहे. जवळ खाडी आहे. या खाडीस रेलवेसाठीं मोठा पूल बांधिलेला आहे.

वसईधसई (ग्रां.) हिं. मुं. इ. ठाणे जि. मुरबाड ता.

वसना (न.) हिं. मुं. इ. सातारा जि. कृष्णेस मिळते.

वसंतगड (कि.) हिं. मुं. इ. सातारा जि. कऱ्हाड ता.

वजासेराय (ग्रा.) यू. र्स. तुर्कस्तानांत.

वसावी (ग्रां.श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचे राज्यांत.

वहिला (न.) हिं. मुं. इ. सिंध दे. शिकारपूर जि. सिंधूस मिळते.

वळणेश्वर (ग्रां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळूण ता. येथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते.

वळसंग (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. सोलापूर ता.
वाई (श.) हिं. मुं. इ. सातारा जि. कृष्णेच्या कांठीं ता.
ब्राह्मणवस्ती पु. आहे. येथें कृष्णेस मोठमोठे घाट
वाई(वाय). (न.) यू. खं. इंग्लंडांत. [बांधिलेले आहेत.
वाईनगंगा (न.) हिं. मध्यप्रां. खुरई डोंगरांतून निघून वर्धेस मिळते.
कांठीं भंडारा, पवनी. लां. ३५० मैल.
वाएलीकसा (श.) यू. खं. रशियांत पोलांदमध्यें. येथील मिठाच्या
खाणीचा घेर ४ कोस आहे.
वाकस (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. कर्जत ता.
वाकानेर (सं.श.) हिं. मुं. इ. काटेवाड प्रां. झालवाड भागांत.
वाकी (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. भीमा नदीचे कांठीं. २ को-
ल्हापूर सं. दुधगंगेच्या उगमाजवळ जंगलाचें नांव.
वाखारी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. कळवण ता.
वागणी (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. वाळवें ता.
वागवारें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. तळोदें ता. [मिळते.
वागरी (न.) हिं. वऱ्हाड. प्रां. अंजिव्याचे डों. निघून पेणगंगेस
वाग्जाई (कि.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. पन्हाळा सं.
वाग्रा (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. भडोच जि. तालुका.
वाघरा (न.) हिं. वऱ्हाडांत बुलटाणें जि. जळगंगेत मिळते.
वाघळी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश. जि. चाळीसगांव ता.
वाघाडी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. शिरपूर ता.
वाघूर (न.) हिं. मुं. इ. खानदेश जि. भुसावळ ता.
वाघोटण (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. देवगड ता.
वाघोडिआ (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचें रा.

वाघोली (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. सोलापूर ता.
वाजपूर (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. गायकवाड सरकारचें [मालकीचें.
वाटखेड (गां.) हिं. वऱ्हाड प्रां.
वाटंबरें (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. सांगोलें ता. माणनदीचे [कांठीं.
वाठार (गां.) हिं. मुं. इ. सातारा. जि. फलटण सं.
वाड(वाडें) (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. खेड ता.
वाडा (गां.) हिं. मध्यप्रां. नर्मदेच्या कांठीं.
वाडापीखरण (गां.) हि. मुं. इ. ठाणे जि. डाहाणू ता.
वाडी(सावंतवाडी) (सं.श.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. मालवण ता. पूर्वेस. लांकडी रंगीत सामान उत्तम होतें.
वाडी (तांब्याची) (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. भुदरगड पेठ्यांत. येथें चित्रें करण्याची प्लास्टर आफ् पारिस नांवाची भुकणी करण्याचे दगड सांपडतात.
वाडें (श.) हिं. मु. इ. ठाणें जि. ता. हवा वाईट. [कांठीं.
वाडेगांव (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. सांगोलें ता. माणनदीचे
वाडेंपडेल (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी. जि. देवगड ता.
वाढीवरें (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. इगतपुरी ता. आम्रारोडवर.
वाण (न.) हिं. वऱ्हाडांत अकोला जि. पूर्णेस मिळते.
वातरफोर्द (श.) यू. खं. अयर्लंद दे.
वातरलू (श.) यू. खं. बेल्जममध्यें. येथें स. १८१५ त इंग्लिश व फ्रेंच यांची मोठी लढाई होऊन इंग्लिशांस जय मिळाला.
वातापी (श.) हिं. मुं. इ. कलादगी जि. यास बदामी म्हणतात.
वात्रक (न.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. ही साबरमतीस मिळते.

वानकुवरऐलंद (बे.) अमे. खं. कानडाचे रा.

वान (श.सरो.) आशि. खं. तुर्कस्तानांत तारसपर्वताचे पूर्वटोंका-
जवळ खारेपाण्याचें. समुद्रापा. साडेपांच हजार
वानचौ (श.) आशि. खं. चिनांत. [फूट उंच.

वानवडी (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. हवेली ता. येथें स. १७१४
त महादजी शिंदे मृत्यु पावले व इंग्लिशांचे
फौजेचें ठाणें.

वान्दिमन्सलांद (बे.) आधि. खं. द. पासि. महासाग. आस्ट्रालियांत
तासमानिया बेटाचें नांव.

वापगांव (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. डाहाणू ता.

वाफगांव (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. खेड ता.

वामणोली(बामणोली) (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. जावली ता.

वामोरी (श.) हिं. मुं. इ. नगर जि. राहुरी ता. धान्याचा मोठा
व्यापार.

वाय (ई) (न.) यू. खं. इंग्लंदांत ब्रिस्टल खाडीस मिळते.

वायगात्स (बे.) यू. खं. रशियाचे उत्तरेस आर्तिक महासागरांत.

वायनाड (प्रां.) हिं. म. इ. मलबार किनाऱ्यावर.

वायव्येकडील प्रां (प्रां.) हिं. खं. इ. चे पश्चिम व वायव्य दिशेस.

वायादगी (श.) हिं. मध्यप्रां. माळव्यांत धार सं.

वायेगांव (गां.) हिं. मध्यप्रां. वर्धा जि. कसबा.

वारणा (न.) हिं. मुं. इ. सातारा जि. पाटण ता. तून हरी-
पुराजवळ कृष्णेस मिळते.

वारन (बे.) आशि. खं. हिंदिमहासा. इंग्रजांचे ताब्यांत.

वारविक (श.प्रां.) यू. खं. इंग्लंदांत.

वारसे (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. पिंपळनेर ता.
वाराना (न.) अमे. खं. द. अमे. लाप्लाता नदीस मिळते.
वारी (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव. ता.
वारूड (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सिंदखेड ता.
वारंगुळ (श.) हिं. निजामचे रा. तैलंगणच्या रा. राजधानी [होती.
वारें (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. कर्जत ता.
वार्ता (न.) यू. खं. मशिया दे. ओद्र नदीला मिळते.
वार्ना (श.बं.) यू. खं. तुर्कस्तानांत बल्गेरीयांत.
वार्सा (श.) यू. खं. रशियांत विस्तुला नदीचे कांठीं.
वाल (श.) यू. खं. स्वित्सर्लंदमध्यें.
वालपारेसो (श.बं.) अमे. खं. द. अमे. चिलीदे.
वालसाल (श.) यू. खं. इंग्लंदामध्यें स्त्याफर्डशायर प्रां. टेननदी- [वर.
वाला (गां.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. महिकांठा एज. गोहिल- [वाड सं.
वालेकिया (प्रां.) यू. खं. तुर्कस्तानांत इस्तरुमेलियामध्यें.
वालेन (प्रां.) यू. खं. स्वित्सर्लंदमध्यें.
वालेनशिया (श.बे.बं.) यू. खं. स्पेन दे. २ अयर्लंदचे पश्चिमेस.
वाल्हेरेन (बे.) यू. खं. हालंद देशाचे ताब्यांत.
वाव (सं.श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. पालनपूर एज.
वावरलें (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. कर्जत ता.
वावी (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. सिन्नर ता. हें शहाजी भोंसल्याचें मूळगांव; ह्यास राजाची वावी म्हण- [तात.
वाश (अखा.) यू. खं. इंग्लंद देशांत. पश्चिम अंगास.
वाशिष्टी (न.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. सह्याद्रींतून निघून अं- जनवेलीजवळ समुद्रास मिळते.

वाशिंगतन (श.) अमे. खं. उ. अमे. युनैतेड्स्तेमध्यें पोतोमाक नदीचे कांठीं स. १७७५ त स्वतंत्र झालें.

वाशिंद (श.) हिं. मुं. इ. ठाणें जि. शहापूर ता. रे. स्टे.

वासडा (सं.श.) हिं. राजपुतान्यांत.

वासदा (सं.श.) हिं. मुं. इ. सुरत जि. पूर्वेस.

वासीम (श.) हिं. वऱ्हाडांत जि. व ता. चें ठिकाण.

वाकी (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. ता.

वाळदे (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. तळोदें ता.

वाळवें (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. भुदरगड पेट्यांत, २ सातारा जि. ता. कचेरी इसलामपूर.

विकलो (पर्व.) यु. खं. अयर्लंदांत.

विकानेर (प्रां.) हिं. राजपुतान्यांत.

विक्तोरिया (प्रां.) आशि. खं. द. पासि. महासाग. आस्त्रालियांत याची राजधानी मेलबोर्न. २ चिनच्या इ. हांगकांग बेटाची रा.

विक्तोरियान्यांजा (सरो.) आफ्रि. खं. मध्य आफ्रिकेंत. क्षे. फळ ५०००० चौ. मैल.

विगन (श.) यु. खं. इंग्लंदमध्यें लंकेशयरमध्यें डग्लस नदीवर.

विचरणा (न.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता. शिनानदीला मिळते.

विचित्रगड (कि.गां.) हिं. मुं. इ. सातार जि. सचिवाचे मुलुखांत तालुक्याचें ठिकाण.

विजगापट्टण (श.बं.) हिं. म. इ. कारोमांडल किनाऱ्यावर उत्तर सरकार्स प्रां. जि. येथें शिंगाच्या डब्या चांगल्या होतात.

विजयगड (कि.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळूण ता.
विजयानगर (श.) हिं. मुं. इ. तुंगभद्रेच्या कांठीं ह्यास नरसिंहपूर ह्मणत असत. उत्तरसरकार्स प्रां.लष्करची छावणी.
विजयदुर्ग (कि.बं.खाडी.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. देवगड.ता. येथें गव्याच्या शिंगांचें काम उत्तम होतें.
विजागापट्टन(श.) हिं. म. इ. येथें कथलाची भांडीं करितात.
विजानग्राम (श.) हिं. म. इ. उत्तरसरकार्स प्रां. जहागीर.
विजापूर (श.) हिं. मुं. इ. जि. येथें इमारती फार उत्तम आहेत. हें मुसलमान लोकांची रा. होती.
विटे (श.) हिं. मुं. इ. सातारा जि. खानापूर ता.
विटोलें (गां.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचे रा.
विडणी (श.) हिं. मुं. इ. सातारा जि. फलटण सं.
विध्याम (न.) यू. खं. इंग्लंदांत.
विदर्भ (दे.) हिं. गोंडवण आहे, तो देश.
विदेह (दे.) हिं. वऱ्हाड प्रांताचें नांव.
विद्दीन (श.) यू. खं. तुर्कस्तानांत. व्यापाराकरितां प्रसिद्ध.
विनिपेग (सरो.) अमे. खं. ब्रिटिश अमेरिकेंत कानडाचे रा. क्षेत्रफळ ९००० चौ. मैल.
विनुकांडा (कि.) हिं. म. इ. गंतूर प्रां.
विनोद (श.) हिं. म. इ. मलबारकिनाऱ्यावर मलबार प्रांतांत.
वियेन्ना (श.) यू. खं. आस्ट्रियादे. दान्युब नदीचे कांठीं. येथें रेशमी व कापसाचीं वस्त्रें व चिनई मातीचीं भांडीं करण्याचे कारखाने आहेत.
विरगांव (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. बागलाण ता.

विरजेंद्रपेंठ (श.) हिं. म. इ. कुर्ग प्रां. कावेरी नदीवर.
विरदेल (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. शिंदखेड ता.
विरमगांव (श.) हिं. मुं. इ. गुजराथ प्रां. अमदाबाद जि. ता.
विराटगड (कि.गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. सचिवाचें सं. तालुक्याचें [गांव.
विरार (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. रे. स्टे.
विरिगोंग (पर्व.) अमे. खं. मेक्सिको देशांत.
विलासपूर (श.) हिं. मध्यप्रां. जि. व ता.
विलिनीस्क (पर्व.) आशि.खं रशियादे. आलताई पर्वताच्या उत्तरेस.
विलेबिला (श.) अमे. खं. द. अमे. बोलिविआ दे.
विलास (प्रां.) यू. खं. इंग्लंदांत दक्षिणेकडील प्रांत.
विल्यारिआल (श.) अमे. खं. द. अमे. लाप्लाता दे.
विवजी (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. डाहाणू ता. रे. स्टे.
विवार (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. वसई ता.
विवरें (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. सावदें. ता.
विशाखपट्टण (श.) हिं. म. इ. विशाखपट्टण जि. चें मुख्य ठिकाण कारोमांडळ किनाऱ्यावर.
विशाळगड (कि.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. व रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.
विश्वगंगा (न.) हिं. वऱ्हाडांत बुलढाणाजवळ निघून जयपूर, बळनेर व चांदूर यांवरून गेली आहे.
विश्वनाथ (श.) हिं. बं. इ. ब्रह्मपुत्रानदीचे कांठीं.
विश्वामित्री (न.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. इचे कांठीं बडोदा शहर.
विसनगर (गां.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचे रा.
विसागोंद (बे.) आफ्रि. खं. अतलांतिक महासागरांत.

विसापूर (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. तासगांव. ता. २ पुणें जि. मावळ ता. डोंगरी किल्ला.

विस्तुला (न.) यु. खं. तुर्कस्तानांतील कार्पेथिअन पर्व. निघून जर्मनींतून बालतिक समु. मिळते.

विहार (सरो.) हि. मुं. इ. ठाणे जि. ठाणें ता. या सरोवराचें पाणी इ. स. १८५७ त मुंबई शहरास नेलें आहे. क्षे. एकर. १५४२. [दक्षिणेस.

विहार (प्रां.) हि. बं. इ. वायव्येस. प्रो. पूर्वेस, नेपाळच्या

वीट (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. करमाळें ता.

वीर (गा.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळोण ता. २ पुणें जि. पुरंदर ता.

वीरगड (गां.) हि. मध्यप्रां. नागपूर पर. वैनगंगानदीचे कांठीं. येथील पिवळे मातीचे टेकड्यांत हिरे सांपडतात.

वुचांग (श.) आशि. मं. चिनांत व्यापाराचें शहर. [वर.

वुडस्टाक (श.) यु. खं. इंग्लंदांत आक्सफर्ड प्रां. इवेनलोड नदी·

वुल्विच (श.) यु. खं. इंग्लंडांत केंत प्रां. तेम्स नदीवर.

वुल्लर (स.) हिं. काश्मिरांत.

वुल्हम्प्टन (श.) यु. खं. इंग्लंदांत स्टफर्डशायरमध्यें स्मेस्टोनवीवर.

वुल्वहार्मतन (श.) यु. खं. इंग्लडांत. [नदीस मिळते.

वुसंग (न.) आशि. चिनांत शांघाय शहराजवळ कंतात

वुसरवी (भ.) हि. मुं. इ. गुज. प्रां. भिल्ल लोकांचें सं.

वुस्टर (प्रां.श.) यु. खं. इंग्लंडांत.

वेक्सफर्ड (श.) यु. खं. अयर्लंडांत; येथें गुरांचा व्यापार चालतो.

वेचलें (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. उरमोडी नदीचे कांठीं.

वेडशी (गां.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. बार्शी ता.
वेढी (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. माहिम ता.
वेणगांव (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. कर्जत ता. यांत भाकटें व मोठें अशीं दोन अर्धकोसाचे अंतरावर आहेत.
वेण्णा (न.) हिं. मुं. इ. सातारा जि. सह्याद्रींतून निघून कृष्णेस मिळते. [चालते.
वेणीकोटें (गां.) हिं. वऱ्हाडमां. वणी जि. येथें कापसाचा व्यापार
वेतर (सरो.) यू. खं. स्विडन दे. क्षे. फळ २१३६ चौ. मैल.
वेतारा (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. कराची जि. तालुका.
वेदगंगा (न.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. सह्याद्रि प. निघून पूर्वेस जाऊन कृष्णेस मिळते.
वेदवर्द (बे.) अमे. खं. मध्य अमेरिकेजवळ वेस्तइंदियन बेटांत लेसर आन्तिलीस बेटांत एक भाग.
वेनर (सरो.) यू. खं. स्विडनमध्यें. क्षे. फळ ८४६ चौ. मैल.
वेनीस (श.अखा.) यू. खं. इटाली दे. पूर्वेस.
वेनेजुएला (अखा.) अमे. खं. द. अमे. वेनेजुएलादेशांत.
वेब (हेयन्स) (न.) आफ्रि. खं. हिंदिमहासागरास मिळते.
वेमौथ (श.) यू. खं. इंग्लंदांत डारसेट प्रां. वेन नदीवर.
वेरवली (गा.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.
वेरळा (न.) हिं. मुं. इ. सातार जि. खटाव ता. ब्रह्मनाळ गांवा- [जवळ कृष्णेला मिळते.
वेराक्रुज (श.) अमे. खं. मेक्सिको दे.
वेरुळ (गां.) हिं. निजामचे रा. दौलताबादेजवळ शिवाजीमहाराजांचे पाटीलकीचे गांव। येथें डोंगरांत लेणीं फार उत्तम असून पुष्कळ आहेत.

वेलस्ली (प्रां.) आशि. खं. इंडियनचायनांत मलाया प्रां.

वेलार (न.) हिं. म. इ. अनोराजवळ उगम पावून पार्तोनोवो जवळ समुद्रास मिळते.

वेलिंगतन (श.) आशि. खं. द. पासि. महासाग. आस्ट्रेलियांत न्युझिलंड बे. वार्थआयलंड बेटांत.

वेलिगामो (बं.) हि. सिलोनच्या उत्तरेस.

वेलोर (श.) हिं. म. इ. वेलोर जि. पालार नदीवर लष्कराची छावणी. बंड सन १८०६. येथें श्रीकृष्णाचें सुं-दर मंदीर आहे.

वेलशपूल (श.) यु. खं. इंग्लंडमध्यें वेल्स प्रां. सेवर्न नदीवर.

वेल्स (प्रां.) यु. खं. इंग्लंड दे. प्रांत.

वेल्हें (गा.) हि. मु. इ. पुणे जि. पुरंदर ता.

वेसवी (गां.) हिं. मु. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.

वेसावें (बं.) हिं. मु. इ. ठाणे जि. साष्टी ता.

वेसुविअस (पर्व.) यु. खं. इटाली दे. नेपल्स शहराजवळ.

वेस्तइंडीज (बे.) अमे. खं. उ. अमे. लगत्यास बेटसमूह.

वेम्तफेलीया (प्रां.) यु. खं. जर्मनीत.

वेळ (न.) हि. मुं. इ. पुणें जि. खेड ता. निघून सांगवीपाशीं मांनेस मिळते.

वेळणेश्वर (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळोण ता.

वेळवंडी (न.) हि. मुं. इ. सातारा जि. भोर सं.

वेळास (गां.) हि. मु. इ. रत्नागिरी जि. दापोली ता.

वेळंब (गा.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. चिपळोण ता.

वैगा (न.) हिं. म. इ. मदुरा जि. नून समुद्रास मिळते.

वैर (श.) हिं. म. इ. मद्रास जि. व ता.

वैजाली (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. शहादे ता.

वैणगंगा (न.) हिं. वाईनगंगा पहा.

वैतर्णी (न.) हिं. मुं. इ. नाशिक जि. त्र्यंबकेश्वराचा. निघून पश्चिमेस अरबी समु. मिळते. २ बं. इ. छोटानागपूर प्रां. ओरिसा प्रां. बंगालच्या उपसागरास मिळते. कांठीं पालमीरा आहे. लां. ११५ मै.

वैनता (न.) हिं. मुं. इ. नाशिक जि. चांदवड ता. तून निघून कादवेस मिळते.

वैपूर (बं. श.) हिं. म. इ. जिल्ह्याचें ठि. रे. स्टे.

वैराग (श.) हिं. मुं. इ. सोलापूर जि. बार्शी ता.

वैरागड (गां.) हिं. वऱ्हाड प्रा. एलीचपूर जि. २ मध्यप्रां. चांदा [जि. कसबा

वोअर (न.) यु. खं. इंग्लंद दे.

वोनाका (बे.) अमे. खं. मध्य अमेरिकेंत हांदुरासचे उपसागरांत.

वोरगांव (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. उरमोडी नदीचे कांठीं.

व्होलगा (न.) यु. खं. रशियांत कास्पिअन समु. मिळते. लां. [२२०० मैल.

वोलो(व्हेले) (अखा.) यु. खं. ग्रीसमध्ये पूर्वकिनाऱ्यावर.

वोळीज (गां.) हिं. मुं. इ. ठाणे जि. वसई ता.

वंग (दे.) हिं. ब्रह्म. दे. चितगांग आहे तो प्रदेश.

वंदन (कि.) हिं. मुं. इ. सातारा जि. वाई ता.

वांकडी (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगांव ता.

वांकी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. तळोदे ता.

वांकडें (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. राजापूर ता.

वांगणी (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. कर्जत ता. रे.स्टे.

वांगी (गां.) हि. मुं. इ. सातारा जि. खानापूर ता. २ सोला-
पूर जि. करमाळे ता. सीनेच्या कांठीं.

वांद्रा (न.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता. शिना न-
दीस मिळते.

वांदीवाश (कि.) हि. म. इ. कारोमांडल किनाऱ्यावर इंग्लिश व
फ्रेंच यांची लढाई स. १७६०

वांद्री (गां.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

वांद्रें (श.) हि. मुं. इ. ठाणें जि. साष्टी ता. रे. स्टे.

विंग (गां.) हि. मुं. इ. सातारा जि. कऱ्हाळें पश्चांत.

विंचूर (श.) हि. मुं. इ. नाशिक जि. निफाड ता. जहागीर-
दाणी उपनांवाच्या घराण्याकडे.

विंचेस्टर (श.) यु. खं. इंग्लंदांत विद्यालयाकरितां प्रसिद्ध.

विंडसर (श.) यु. खं. इंग्लंदांत येथें राजवाडा असून तेथें
महाराणी साहेब व्हिक्टोरिया ह्या रहातात.

विंदरमीर (सरो.) यु. खं. इंग्लंदांत. [मिळते.

विंदेल (न.) यु. खं. स्विट्झर्लंडांतून निघून बाल्टिक समुद्रास

विंध्याद्रि (पर्व.) हि. नर्मदा नदीच्या उत्तरेस पूर्वपश्चिम.

वेंगुर्ले (श.) हि. मुं. इ. रत्नागिरी. जि वेंगुर्ले ता. किल्ला आहे.

वृंदावन (गां.) हि.वाय.प्रां. मथुरेजवळ येथें फार देवळें आहेत.

व्याघ्रा (न.) हि. वऱ्हाडांत वर्धा जि. पाईनगंगेस मिळणारी

व्हाइटहेवन (श.) यु. खं. इंग्लंदांत कंबरलंद प्रा. [नदी.

व्हिक्टोरीया (कि.) हि. मुं. इ. रत्नागिरी जि. दापोली ता. बाणकोटा

व्हेन (बे.) यु. खं. इंग्लंदांत. [जवळ.

श.

शृंगेरी (श.) हिं. म. इ. म्हैसूर सं. हरीहर ता. येथें हिंदुधर्माचे मुख्य गुरु श्रीशंकराचार्य यांचा मठ

शमशाबाद (गां.) हिं. वाय. प्रां. फरकाबाद पा. १२ मैल. [आहे.

शयोक (न.) हिं. सिंधूस डाव्या अंगानें मिळते. [ळते.

शरयु (न.) हिं. शिवालीक पहाडांतून निघून भागीरथीस मि-

शरावती (न.) हिं. मुं. इ. उत्तर कानड्यांतून निघून अरबी समुद्रास मिळते. इचा गरसप्पा येथें मोठा धबधबा

शर्वेरी (बे.) आफ्रि. खं. अटलांटिक महासागरांत. [आहे.

शहादादपूर (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. हैदराबाद जि. तालुका.

शहा (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. सिन्नर ता.

शहागड (श.) हिं. मध्यप्र० सागर जि. येथें पागोटीं, लोखंड

शहाजहानपूर (श.)हिं. वाय. प्रां. जि. व ता. [तयार होते.

शहाजापूर (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. कोपरगाव ता.

शहाजादपूर (श.) हिं. अयोध्या प्रां.

शहादें (श.) हिं. मुं.इ. खानदेश जि.ता. गोमती नदीचे कांठीं.

शहापूर (गां.श.) हिं. मुं.इ. खानदेश जि. जामनेर ता. २ मध्यप्र. मंडला जि. ३ पं. इ. जि.

शहाबाज (बे.) हिं. बं. इ. ब्रह्मपुत्रेच्या मुखाजवळ बेट.

शहाबंदर (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रां. कराची जि. तालुका.

शहिस्थान (प्रां.) आशि. खं. अफगाणिस्तानांत असा सरोवराचे

शातुल (प्रां.) हिं. हिमालय पर्वतांतील. [पूर्वेस.

शान (दे.) आशि. खं. पूर्वेकडील द्वीपकल्पांत. यांत सोनें, रुपें, तांबें व कथील यांच्या खाणी आहेत.

शानन (न.) यु. खं. अयर्लंदांत मोटी नदी. आतलांतीक [महासागरास मिळते.

शानी (सरो.) आशि. खं. रुस दे.

शापेल (श.) यु. खं. मांग्या देशांत.

शाम (पर्व.) हिं. वं. इ. पूर्वेस ब्रह्मदे. दक्षिणेस सयाम व तेनासरीम ह्यांचे मध्यें.

शारी (न.) आफ्रि. खं. मध्य आफ्रि. चांदसरोवरास मिळते.

शार्लेतान (श.) अमे. खं. प्रिन्सएड्वर्ड बेटांत.

शास्त्री (न.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. जयगडाजवळ समु. [मिळते.

शाहाडोंगर (पर्व.) हिं. मुं. इ. नगर जि. नगराचे पूर्वेस.

शाहाणपूर (न.) हिं. वऱ्हाड प्रा. अकोला जि. पूर्णा नदीस मि- [ळते.

शाहापूर (श.) हिं. मुं. इ. ठाणे जि ता.

शाहापुरी (बे.) आशि. ख. द. हिंदिमहासागरांत बंगालच्या उपसागरांत इंग्लिशांचे ताब्यांत.

शाहाबाद (श.) हिं. वा. प्रां. औध पर. शाहाजहानपुराहून १५ मैल द. पं.इ.या प्रांतांतून कर्मनाशा नदी निघते.

शिकरूल (श.) हिं. आयोध्या प्रा. व्यापाराकरितां प्रसिद्ध.

शिकागो (श.) अमे. खं. उत्तर अमे. युनैटेडस्टेटमध्यें मिचिगान सरोवराचे कांठीं. येथे स. १८९३ त जगांतील पदार्थांचे अति मोठें प्रदर्शन झालें.

शिकारपूर (श.) हिं. मुं. इ. सिंध प्रा. जिल्हा.

शिकंदरा (श.) हिं. वाय. प्रा. आग्र्याजवळ; येथे अकबराची कबर आहे.

शिकंदराबाद (श.) हि. निजामचे राज्यांत; येथे इंग्लिशांची छावणी [आहे.

शिकापूर (गा.) हिं. मुं. इ. पुणें जि. वेळ नदीचे कांठीं.

शिक्री (गां.) हिं. वाय. प्रां. दिल्लीच्याद.१० मै. संग व बाबर. ल. १५२७. येथे दगडावर खोदिव काम उत्तम [करितात.

शिगणापूर (गां.) हिं. मुं. इ. सातारा. जि. माणना.

शिगांव (गां.) हिं. वऱ्हाड प्रां. आकोला जि.

शितारा (प्रां.) हिं. निजामचे राज्यांत औरंगाबादेजवळ.

शिदफणा (न.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता. ही गोदावरीस [मिळते.

शिदापूर (श.) हिं. मुं. इ. कारवार जि. तालुका.

शिनसा (न.) हिं. म. इ. म्हैसूर प्रं. कावेरीला मिळते.

शिना (न.) हिं. मुं. इ. नगर जि. कर्जत ता. जेऊराहून नि-घून गोदेस मिळते.

शिनोर (श.) हिं. मुं. इ. गुज. प्रां. गायकवाडचे रा. जि.

शिन्नर (श.) हिं. मुं. इ. नाशिक जि. तालुका. येथें हेमाड-पंती दोन देवालयें आहेत व विड्याचीं पानें व अजीर फार चांगले होतात. नाशिक पा. १८ मैल.

शिपोशी (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. संगमेश्वर ता.

शिमगा (श.) हिं. मध्यप्रा. रायपूर जि. ता.

शिमला (शिख.) हिं. पं. इ. अंबालाच्या उत्तरेस हवेचें ठिकाण; येथें गवरनरजनरल राहतात.

शिमोगा (श.) हिं. म. इ. म्हैसूर प्रां. तुंगानदीचे कांठीं.

शिरखानवाला (गा.) हिं. वाय. प्रां. सरहिंद पर. फिरोजपुराहून ९ मैल.

शिरगांव (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी. जि. रत्नागिरी ता. चिपळूण ता. व देवगड ता. २ ठाणें जि. माहिम ता.

शिरढोण (गां.) हिं. मुं. इ. कुलाबा जि. पनवेल ता. येथें स.

१८८० त वासुदेव बळवंत फडके म्हणून शूर पुरुष होऊन गेला. २ कोल्हापूर सं. अजरें ता.

शिरपूर (श.) हिं. मुं. इ. खानदेश जि. तालुका.

शिरवळसांगवी (गां.) हिं. मुं. इ. सातारा जि. निरानदीचे कांठीं-

शिरवडें (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. वेंगुर्लें ता.

शिरवाडें (गां.) हिं. मुं. इ. नाशिक जि. निफाड ता. आग्यारोड-वर.

शिरवारीस (श.) हिं. मुं. इ. कर्नाटक प्रां. येथें कापी उत्पन्न होते.

शिरशी (श.) सिरसी शब्द पहा.

शिरसी (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. खेड ता.

शिरसमणी (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. अमळनेर ता.

शिरसमार्ग (गां.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता.

शिरहट्टी (श.) हिं. मुं. इ. द. महाराष्ट्र दे. सांगली सं. तुंगभद्रेच्या कांठीं.

शिरसोली (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. जळगांव ता. रे. स्टे. विड्याचीं पानें होतात.

शिराज (श.) आशि. खं. इराण दे. येथें मद्य चांगलें होतें. येथें सादी व हाफीज हे कवी जन्मले.

शिराजगंज (श.) हिं.बं.इ.येथें ताग व सण यांचा व्यापार चालतो.

शिरामपूर (श.) हिं. बं. इ. कलकत्त्याजवळ हें पूर्वी डचलो-कांचें शहर होतें.

शिराळें (श.) हिं. मुं. इ. सातारा जि. पेटा. येथें पितळी स-मया चांगल्या होतात.

शिरी (न.) आफ्रि. खं. मध्य आफ्रिकेंत आबीलीला मिळते.

शिरीवान (श.) आशि. ख. ध्रान्सकाकेशियांत कास्पिअन समुद्राचे कांठीं प्रांत.

शिरूड (गां.) हिं. मुं. इ. खानदेश जि. शहादे ता. २ धुळें ता. बोरी नदीचे काठीं.

शिरूर (श.) हिं. मुं. इ. नगर जि. जामखेड ता. २ पुणें जि. तालुका; याचें ठाणें घोडनदी आहे. ल. छावणी.

शिरोली (गां.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. वडगांव ता.

शिरोशी (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. मुरबाड ता.

शिरोळ (श.) हिं. मुं. इ. कोल्हापूर सं. तालुका.

शिलंद (गां.) हिं. मुं. इ. ठाणें जि. मुरबाड ता.

शिलहस (श.) यू. सं. इंग्लंडांत तैन नदीवर.

शिवगंगा (न.) हिं. मुं. इ. पुणें जि. इथे कांठीं नसरापूर. २ म. इ. मदुरा जि. येथें प्रसिद्ध देवस्थान आहे.

शिवनाथ (न.) हिं. मध्यप्रां. महानदीला मिळणारी नदी.

शिवनी (श.) हिं. मध्यप्रां. जि. व ता. व्यापाराची पेठ रे. स्टे. २ वऱ्हाड प्रां. बुलढाणा जि. गांव.

शिवनेर (श.कि.) हिं. मुं. इ. पुणें जि. जुन्नर ता. येथें श्रीशिवाजी महाराजांचा इ. स. १६२७ त जन्म झाला.

शिवपूर (गां.) हिं. मध्य हिं. शिंद्याचे राज्यांत.

शिवरीनारायण (श.) हिं. मध्यप्रां. बिलासपूर जि. ता.येथें शबरीनारायणाचें देवळ आहे. महानदीचे कांठीं.

शिवलारी (शिख.) हिं. बं. इ. ओढीसाप्रां. पुरीजवळ येथें ऋषींच्या पुष्कळ पर्णकुटिका आहेत. [लागवड होते.

शिवसागर (गां.) हिं. आसामप्रां. दिहोंग नदीवर; येथें चहाची

शिवापूर (गां.) हिं. मुं. इ. पुणें जि. हवेली ता. शिवगंगा नदीचे कांठीं.

शिवालीक (पर्व) हिं. उत्तरेस नेपाळच्या दक्षिणेस पर्वतांची ओळ.

शीळ (गां.) हिं. मुं. इ. रत्नागिरी जि. ता.

शुक्राचार्य (क्षे.) हिं. मुं. इ. सातार जि. शंभुमहादेवाच्या डोंगरांत ओळ आहे.

शुम्ला (श.) यू. खं. तुर्कस्तानांत.

शूरसेन (प्रां.) हिं. वाय. प्रां. आग्र्यानजीक मुलूख.

शेकावती (सं.श.) हिं. राजपुतान्यांत जयपूर स.

